नोंदणी क्रमांक : MAHMAR/2021/82132 | पाने : ४ | वर्ष : ४थे | अंक : १५४ | किंमत : ४ रूपये
Gmail : aklgavakari@gmail.com
Gmail : punegavkari@gmail.com




महाराष्ट्राचे सर्वमान्य दैनिक

# समर्थ गांवकरी

संपादक : डॉ. विश्वासराव आनंदराव आरोटे
POSTAL REGISTRATION NO : SRP/137/2023-2026




गुरुवार, दि. ०७ मे २०२६

मुंबई, अहमदनगर, पुणे, नाशिक, जळगाव, धुळे, नंदुरबार, सिंधुदुर्ग, रत्नागिरी, पालघर, सांगली, सातारा, कोल्हापूर, सोलापूर, औरंगाबाद, बीड, नांदेड, परभणी, हिंगोली, लातूर, बुलढाणा, अमरावती, अकोला, नागपूर, गडचिरोली, भंडारा, गोंदिया, यवतमाळ, वर्धा, येथून एकाच वेळी प्रकाशित होणारे दैनिक

## सुनेत्रा पवार यांचा राजीनामा

### राज्यसभेत राष्ट्रवादी काँग्रेसचे किती खासदार? रिक्त जागेवर कोणाला संधी?



**मुंबई : (स. गांवकरी)**

महाराष्ट्राच्या उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांनी त्यांच्या खासदारकीचा राजीनामा उपराष्ट्रपती सी. पी. राधाकृष्णन यांच्याकडे राजीनामा सोपवला. दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या निधनानंतर रिक्त झालेल्या बारामती विधानसभा मतदारसंघाच्या पोटनिवडणुकीत सुनेत्रा पवार विक्रमी मतांनी विजयी झाल्या. विधानसभा निवडणुकीला सर्वाधिक मतांनी विजयी होण्याचा विक्रम त्यांच्या नावावर नोंदवला गेला आहे. बारामती विधानसभा मतदारसंघाच्या पोटनिवडणुकीचा निकाल 4 मे रोजी जाहीर झाला, त्यानंतर सुनेत्रा पवार यांनी आज नवी दिल्लीत उपराष्ट्रपतींची भेट घेत त्यांनी राज्यसभेच्या खासदारकीचा राजीनामा दिला. सुनेत्रा पवार यांनी राज्यसभेच्या खासदारकीचा राजीनामा देण्यापूर्वी राष्ट्रवादी काँग्रेसचे राज्यसभेत चार खासदार होते. आता सुनेत्रा पवार यांच्या राजीनाम्यानंतर राष्ट्रवादीच्या खासदारांची राज्यसभेतील संख्या 3 इतकी राहिली आहे. राज्यसभेत राष्ट्रवादीचे तीन खासदार आहेत त्यामध्ये प्रफुल पटेल, पार्थ पवार आणि नितीन काका पाटील यांचा समावेश आहे. प्रफुल पटेल 2024 मध्ये राज्यसभेचे खासदार बनल्यानं त्यांचा कार्यकाळ 2030 पर्यंत राहील. प्रफुल पटेल 2022 मध्ये राष्ट्रवादी काँग्रेसचे खासदार म्हणून निवडून आले होते. मात्र, 2023 मध्ये राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये फूट पडल्यानंतर ते अजितदादांच्या राष्ट्रवादीसोबत गेले. यामुळं त्यांनी जुन्या खासदारकीचा राजीनामा दिला आणि ते पुन्हा 6 वर्षांसाठी खासदार बनले.

#### पार्थ पवार २०३२ पर्यंत खासदार

महाराष्ट्रातून गेल्या महिन्यात 7 खासदारांची निवड राज्यसभेत करण्यात आली. यामध्ये राष्ट्रवादी काँग्रेसनं पार्थ पवार यांना संधी दिली. यामुळं पार्थ पवार राष्ट्रवादी काँग्रेसचे राज्यसभा खासदार म्हणून 2032 पर्यंत कार्यरत राहतील.

#### सुनेत्रा पवार यांच्या जागी कोणाला संधी ?

सुनेत्रा पवार सध्या राष्ट्रवादी काँग्रेसच्या राष्ट्रीय अध्यक्ष आहेत. आता त्यांनी राजीनामा दिल्यानं साधारणपणे 2 ते अडीच वर्ष कालावधी शिल्लक असलेल्या राज्यसभेच्या खासदारकीवर कोणाला संधी मिळणार याकडे सर्वांचं लक्ष लागलं आहे. राष्ट्रवादी काँग्रेसचे ज्येष्ठ नेते मंत्री छगन भुजबळ आणि जय पवार यांची नावं सध्या चर्चेत आहेत.

## ‘मुख्यमंत्री विद्यार्थी विज्ञान वारी' उपक्रमाला मंजुरी

**मुंबई : (स. गांवकरी)**

राज्यातील विद्यार्थ्यांमध्ये वैज्ञानिक दृष्टिकोन आणि संशोधनवृत्ती वाढवण्यासाठी शासनाने ‘मुख्यमंत्री विद्यार्थी विज्ञान वारी’ हा महत्त्वाकांक्षी उपक्रम सुरू करण्याचा निर्णय घेतला आहे. या उपक्रमाला अधिकृत मान्यता देण्यात आली असून यासाठी सुमारे 3.30 कोटी रुपयांचा खर्च केला जाणार आहे, अशी माहिती शालेय शिक्षण मंत्री दादा भुसे यांनी दिली. या उपक्रमांतर्गत विज्ञान प्रदर्शनांमध्ये उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या विद्यार्थ्यांना देशातील आणि परदेशातील नामांकित संशोधन संस्थांना भेट देण्याची संधी मिळणार आहे. यामध्ये इस्रो आणि अमेरिकेतील नासा केंद्राचा समावेश आहे. या उपक्रमाचा मुख्य उद्देश विद्यार्थ्यांमध्ये वैज्ञानिक दृष्टिकोन, तर्कशुद्ध विचारसरणी आणि समस्या सोडवण्याची क्षमता विकसित करणे हा आहे. संशोधन आणि नवोपक्रम यांना प्रोत्साहन देऊन विद्यार्थ्यांना भविष्यासाठी सक्षम बनवण्यावर सरकारचा भर आहे. राष्ट्रीय शैक्षणिक धोरण 2020 च्या अनुषंगाने हा उपक्रम राबवण्यात येणार आहे. विज्ञान आणि तंत्रज्ञानाविषयी विद्यार्थ्यांमध्ये आवड निर्माण व्हावी आणि अनुभवाधारित शिक्षणाला चालना मिळावी, हा यामागचा उद्देश आहे. या योजनेअंतर्गत तालुकास्तरावर विज्ञान प्रदर्शनात प्रथम येणाऱ्या 2148 विद्यार्थ्यांना जवळच्या विज्ञान केंद्रांना भेट दिली जाणार आहे. जिल्हास्तरावर निवड झालेल्या 180 विद्यार्थ्यांना बंगळुरू येथील इस्रो केंद्राला भेट देण्याची संधी मिळणार आहे. तसेच राज्यस्तरीय विज्ञान प्रदर्शनात उत्कृष्ट ठरलेल्या 51 विद्यार्थ्यांना अमेरिकेतील नासा केंद्राला भेट देण्याची विशेष संधी देण्यात येणार आहे.

- विद्यार्थ्यांना इस्रो आणि नासा भेटीची संधी



## थोडक्यात...

### तातडीने उपाययोजना कराव्यात : देसाई

मुंबई (स. गांवकरी) : चंद्रपूर जिल्ह्यात कोळशाच्या ओव्हरलोड वाहतुकीमुळे निर्माण झालेल्या प्रदुषणविषयक समस्यांवर पर्यावरण, खनिकर्म, परिवहन व स्थानिक प्रशासन यांनी सुचविलेल्या सूचनांची वेस्टर्न कोलफिल्ड्स लिमिटेडने कंपनीनीने तात्काळ अंमलबजावणी करावी असे निर्देश खनिकर्म मंत्री शंभूराज देसाई यांनी दिले. स्थानिक नागरिकांचे आरोग्य लक्षात घेऊन वेस्टर्न कोलफिल्ड्स लिमिटेडने कंपनीनीने कंपनीने आपल्या कार्यपद्धतीत तातडीने बदल करणे अनिवार्य असल्याचेही त्यांनी यावेळी स्पष्ट केले. सह्याद्री अतिथीगृह येथे चंद्रपूर जिल्ह्यातील कोळसा उत्खनन व वाहतूकीवर नियंत्रण ठेवण्याकरिता उपाययोजना करण्याबाबत आयोजित बैठकीत खनिकर्म मंत्री शंभूराज देसाई बोलत होते. या बैठकीला आमदार कृपाल तुमाने,परिवहन आयुक्त राजेश नार्वेकर, भूविज्ञान व खनिकर्म संचालनालयाचे संचालक डॉ गजानन कामडे, चंद्रपूरचे निवासी जिल्हाधिकारी दगडू कुंभार हे व्हीसीव्दारे, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाचे प्रधान वैज्ञानिक अधिकारी डॉ विश्वजीत ठाकूर, जिल्हा खनिकर्म अधिकारी चंद्रपूर वसीम सय्यद, जिल्हा पोलीस अधिक्षक चंद्रपूर आयुष नोपानी यासह विविध विभागाचे अधिकारी या बैठकीला उपस्थित होते.

### टेस्ट ड्राईव्हच्या बहाण्याने चोरी

पुणे (स. गांवकरी) : ‘ओएलएक्स’वर दुचाकी विक्रीची ऑनलाइन जाहिरात देणे एका वाहनमालकाला चांगलेच महागात पडले. ‘टेस्ट ड्राईव्ह’च्या बहाण्याने दुचाकी चोरून नेणाऱ्यास विमानतळ पोलिसांनी ताब्यात घेतले आहे. महम्मद मुजबता इकबाल शेख (वय २७, रा. खडी मशिन चौक, कोंढवा) असे आरोपीचे नाव आहे. फिर्यादी यांनी त्यांची दुचाकी विक्रीसाठी ओएलएक्सवर पोस्ट केली होती.

## ‘टीव्हीके’कडून सरकार स्थापन करण्याचा दावा; पण...

**मुंबई : (स. गांवकरी)**

- राज्यपालांचं नियमावर बोट, विजय जोसेफ कशी घेणार शपथ?

तामिळनाडूच्या विधानसभा निवडणुकीत विजय जोसेफ यांच्या टीव्हीके पक्षाने तब्बल १०८ जागा जिंकत मोठा विजय मिळवला आहे. मात्र, १०८ जागा जिंकल्या असल्या तरी टीव्हीके पक्ष बहुमतापासून दूर असल्यामुळे सरकार स्थापन करण्यासाठी विजय जोसेफ यांना तारेवरची कसरत करावी लागत असल्याचं पाहायला मिळत आहे. काँग्रेस पक्षाने टीव्हीके पक्षाला पाठिंबा दिला असून आता आमदारांचं संख्याबळ ११३ पर्यंत पोहोचलं आहे. मात्र, ११८ या बहुमताच्या आकड्यापर्यंत पोहोचण्यासाठी आणखी पाच आमदारांचं संख्याबळ हवं आहे. त्यामुळे तामिळनाडूत मोठ्या राजकीय घडामोडी सुरू आहेत. दरम्यान, आज टीव्हीके प्रमुख विजय जोसेफ यांनी तामिळनाडूचे राज्यपाल राजेंद्र विश्वनाथ आर्लेकर यांची भेट घेऊन तामिळनाडूमध्ये पुढील सरकार स्थापन करण्याचा दावा केला आहे. तसेच तामिळनाडूच्या राज्यपालांकडे टीव्हीकेच्या १०८ आमदार आणि काँग्रेसच्या ५ आमदारांचा पाठिंबा असल्याच्या सहीचं पत्र दिलं आहे. मात्र, सरकार स्थापन करण्यासाठी कोणत्याही पक्षाकडे ११८ आमदारांचं संख्याबळ आवश्यक असल्याने राज्यपालांनी नियमावर बोट ठेवलं आहे. टीव्हीके प्रमुख विजय जोसेफ यांनी ११३ आमदारांच्या पाठिंब्याचं पत्र सादर केलं असलं तरी राज्यपालांनी ‘११८ आमदारांच्या पाठिंब्याचं पत्र घेऊन परत या’ असं सांगितलं असल्याची चर्चा आहे.

## शैक्षणिक पंढरीत बोगस शाळांचा सुळसुळाट



**पुणे : (स. गांवकरी)**

- पुणे महापालिकेकडून १३ शाळांची यादी जाहीर
- पालकांना सूचना, प्रवेश घेऊ नका

महाराष्ट्राची शैक्षणिक पंढरी असलेल्या पुणे शहरात शिक्षणाचा खेळखंडोबा झाल्याचं समोर आलं आहे, कारण एक-दोन नाही तर तब्बल 13 शाळा बोगस असल्याचं उघडकीस आल्याने खळबळ उडाली आहे. पुणे महानगरपालिकेने स्वतः शहरातील 13 बोगस शाळांची यादी जाहीर केली आहे. विशेष म्हणजे जाहीर झालेल्या या संपूर्ण शाळांची नावे एकदम फर्स्ट क्लास असून काही इंग्रजी तर काही मराठी माध्यमातल्या शाळा आहेत. त्यामुळे, यापुढे या तेरा शाळांमध्ये विद्यार्थ्यांचा प्रवेश घेऊ नका, असे आवाहन पुणे महानगरपालिकेनं केलं आहे. तर, विद्यार्थ्यांचा प्रवेश घेतल्यास विद्यार्थ्यांचे नुकसान होईल, असाही इशारा महापालिकेनं दिला आहे. शिक्षणाचा माहेरघर असलेल्या पुण्यातच 13 बोगस शाळा असल्याची यादी पुणे महानगरपालिकेने आज जाहीर केली आहे. या तेरा शाळांमध्ये कोणीही प्रवेश घेऊ नये असा आवाहनही परिपत्रक काढून पुणे महानगरपालिकेने केले. या शाळांची नाव बघितली तर संपूर्ण इंग्रजी आणि लॅविश नावं दिसत आहेत. मात्र, या शाळा बोगस असल्याचं महापालिकेने स्पष्ट केलं आहे. त्यामुळे पुण्यात विद्यार्थ्यांच्या भवितव्याचा मोठा प्रश्न उपस्थित होत आहे. या शाळांनी शिक्षणाचा खेळ खंडोबा मांडलाय का? असाही प्रश्न या निमित्ताने उपस्थित होत आहे. तसेच, एकीकडे शैक्षणिक पंढरी म्हणून देशात नाव असलेल्या पुणे शहरात जगभरातील विद्यार्थी शिक्षणासाठी येतात. मात्र, या पुणे शहरातील शिक्षणाचा पायाच ढिसाळ झाल्याचं या 13 बोगस शाळांच्या उघड होण्याचे दिसून आलं आहे.

#### बोगस १३ शाळांची यादी

1. न्यू मिलेनियम स्टार इंग्लिश मिडीयम स्कूल बिबवेवाडी पोलिस स्टेशन जवळ विमलविहार समोर, चितामणी नगर,
2. महात्मा गांधी प्रशाला प्लॉट नं.५२, लेन नं.२B संजय पार्क, येवलेवाडी, पुणे
3. टीएम तखवा इस्लामिक स्कूल अँड मदरसा, स.न. ७०/१/१, NIBM रोड कोंढवा बु पुणे-४११०४८
4. सेंट क्यूट्र इंटरनॅशनल स्कूल कोंढवा बु पुणे
5. इमॅन्युअल पब्लिक स्कूल, महंमदवाडी रोड हडपसर पुणे-२८
6. आनंदाशा अकॅडमी स्कूल अजिंक्य डी. वाय. पाटील रोड लोणीकालभोर पुणे
7. एलोरा मेडिकल अँड एज्युकेशन फाउंडेशन आयर्न पब्लिक स्कूल मानाजी नगर नरे, पुणे
8. लेजसी हाय स्कूल अशोक नगर कोंढवा बु पुणे
9. शिवाली नोमानी इंग्लिश मिडीयम स्कूल अशोक नगर कोंढवा बु पुण
10. ऑलिव्ह व इंटरनॅशनल स्कूल, उंडी ता. हवेली पुणे
11. ग्लोबल एज्युकेशन ट्रस्ट पुणे इकरा इस्लामिक स्कूल, कोसरवाडी कोंढवा पुणे
12. ग्लोबल इंग्लिश मिडीयम स्कूल, औंधवा बु पुणे
13. आयर्न वर्ल्ड स्कूल, उंड्री पुणे

## शिर्डीत भाविकाची मोगऱ्याच्या गजरा विक्रीतून लूट

### भावनेला हात घालत विक्रेत्याकडून फसवणूक

**राहाता : (स. गांवकरी)**

साईबाबांच्या शिर्डीत मोगरा फुलांच्या गजऱ्याच्या माध्यमातून भाविकांची फसवणूक होत असल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. यापूर्वी हार, फूल आणि प्रसादाच्या माध्यमातून भाविकांची लूट होत असल्याच्या घटना समोर आल्या होत्या. आता गजऱ्याच्या नावाखाली नव्या पद्धतीने फसवणूक केली जात असल्याचे समोर आले आहे. याप्रकरणी एका भाविकाने साईबाबा संस्थानच्या सुरक्षा विभागात लेखी तक्रार दाखल केल्याने संबंधित गजराविक्रेत्याविरुद्ध प्रतिबंधात्मक कारवाई करण्यात आली आहे. डोंबिवली (ठाणे) येथील भाविक जयेंद्र लाभशंकर मेहता हे पहाटे साईबाबांच्या दर्शनासाठी शिर्डीत आले होते. काकड आरती सुरू असताना ते द्वारकामाई मंदिराकडे जाताना द्वारकामाईसमोर एका गजराविक्रेत्याने त्यांना अडवले. माझ्याकडून मोगऱ्याच्या माळा घ्या, अजून कोणीही माळा घेतलेल्या नाहीत. द्वारकामाई, चावडी, गुरुस्थान, मारुती मंदिर आणि साईबाबांच्या समाधी मंदिरात तुमची पहिलीच फुलमाळ जाईल, असे सांगून भाविकाला भावनिकरीत्या माळा घेण्याकरिता प्रवृत्त केले. त्या विक्रेत्याच्या बोलण्यावर विश्वास ठेवून मेहता यांनी त्याच्याकडून दोन-तीन लहान आणि तीन-चार मोठ्या माळा घेतल्या. त्या वेळी त्यांच्याजवळ पाकीट नसल्याने त्यांनी पैसे विचारले असता विक्रेत्याने २ हजार रुपये झाल्याचे सांगितले.

दर्शन करून परतल्यानंतर विक्रेत्याने तब्बल २ हजार रुपयांची मागणी केली. प्रत्यक्षात माळांची किंमत सुमारे २०० रुपये होती. मात्र, २ हजार रुपये मागितल्याने आपली फसवणूक झाल्याचे मेहता यांच्या लक्षात आले. विक्रेत्याने १४ ते १५ वेळा फोन करून पैशासाठी त्रास दिल्याची लेखी तक्रार मेहता यांनी थेट साईबाबा संस्थानच्या सुरक्षा विभागात दिली. द्वारकामाई परिसरात गजरा विक्री करणाऱ्या संजय देशमुख याच्याविरोधात यापूर्वीही अनेक तक्रारी दाखल झाल्याची माहिती समोर आली आहे. त्यामुळे संस्थान, नगरपालिका आणि पोलीस प्रशासनाने यावर कठोर कारवाई करावी, अशी मागणी होत आहे. शिर्डीत भाविकांची हार-फूल आणि प्रसादाच्या माध्यमातून होणारी लूट रोखण्यासाठी यापूर्वी विक्रेत्यांवर काही निर्बंध लावण्यात आले होते, तसेच दलालांवरही कारवाई केली होती. त्यामुळे काही प्रमाणात फसवणुकीच्या प्रकारांना आळा बसला होता. गजऱ्याच्या माध्यमातून ही नव्या प्रकारची फसवणूक समोर आली आहे.




#### अवाजवी किंमत मागितली

अशा लोकांमुळे शिर्डीचे नाव खराब होत आहे. गजराविक्रेत्याने माझ्याकडून अवाजवी पैसे मागितल्याने मला त्याचा मानसिक त्रास झाला. हा प्रकार मला सहन न झाल्यामुळे मी संस्थानाच्या सुरक्षा विभागाकडे लेखी तक्रार दिली.

**– जयेंद्र मेहता, भाविक.**

#### विक्रेत्याविरोधात गुन्हा दाखल

भाविक आणि गजराविक्रेता यांना समोरासमोर बसवून दोन्ही बाजू ऐकून घेतल्या. प्राथमिक चौकशीत भाविकाची फसवणूक झाल्याचे स्पष्ट झाल्यानंतर तक्रार नोंदवण्यात आली. त्यानंतर संबंधित गजराविक्रेत्याला शिर्डी पोलिसांच्या ताब्यात देण्यात आले. संजय देशमुख असे विक्रेत्याचे नाव आहे. त्याच्याविरोधात मुंबई पोलीस कायदा कलम ११२, ११७ अंतर्गत प्रतिबंधात्मक कारवाई करण्यात आली आहे.

**– रोहिदास माळी, सुरक्षा अधिकारी, साईबाबा संस्थान, शिर्डी.**



## थोडक्यात पण महत्वाचे



### शेतकऱ्यांची फसवणूक करणारा सहा महिन्यांपासून फरार आरोपी जेरबंद

श्रीगोंदा (स. गांवकरी) : शेतकऱ्यांची लाखो रुपयांची फसवणूक करून मागील सहा महिन्यांपासून फरार असलेल्या आरोपीस श्रीगोंदा पोलिसांनी अटक केली आहे. याबाबत श्रीगोंदा पोलीस ठाण्यात फिर्यादी अशोक बाजीराव भोसले (रा. श्रीगोंदा, जि. अहिल्यानगर) यांनी दि. 23 नोव्हेंबर 2025 रोजी तक्रार दाखल केली होती. त्यानुसार, रुपेश अशोक पवार (रा. कानमंडळे, ता. चांदवड, जि. नाशिक) याने स्वामी बाळासाहेब पिसे यांच्या मध्यस्थीने श्रीगोंदा व कर्जत तालुक्यातील शेतकऱ्यांचा विश्वास संपादन केला. 'रुपेश पवार फाउंडेशन'च्या माध्यमातून शासकीय सोलर पंप मिळवून देण्याचे आमिष दाखवून त्याने विविध शेतकऱ्यांकडून एकूण 7 लाख 80 हजार रुपयांची फसवणूक केल्याचे तक्रारीत नमूद आहे. गुन्हा दाखल झाल्यानंतर आरोपी फरार होता. दरम्यान, तो मुंबई येथे असल्याची गोपनीय माहिती पोलीस निरीक्षक किरण शिंदे यांना मिळाल्यानंतर तपास पथकाला शोधमोहीम राबविण्याच्या सूचना देण्यात आल्या. तपासादरम्यान आरोपीने तीन दिवस पोलिसांना चकवा दिला. नंतर तो आपल्या मूळ गावी परतल्याची माहिती मिळाल्यानंतर पथकाने वेशांतर करून कानमंडळे (ता. चांदवड, जि. नाशिक) येथून त्याला ताब्यात घेतले. ही कारवाई पोलीस अधीक्षक मुम्मका सुदर्शन, अप्पर पोलीस अधीक्षक वैभव कलबुर्मे, उपविभागीय पोलीस अधिकारी प्रवीणचंद लोखंडे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक किरण शिंदे यांच्या सूचनेनुसार पार पडली. या पथकात पो.ना. गहिनीनाथ यादव, पो.कॉ. संदीप राऊत, महादेव कोहक, सचिन वारे, अरुण पवार, विवेक दळवी तसेच दक्षिण मोबाईल सेलचे राहुल गुंडु यांचा समावेश होता. पुढील तपास पोलीस निरीक्षकांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक पोलीस निरीक्षक गणेश आहिरे व पोलीस नाईक गणेश गाडे करत आहेत.

### विजेच्या कडकडाटासह मध्यम स्वरुपाचा पाऊस पडण्याची शक्यता

नांदेड जिल्हा (स. गांवकरी) : प्रादेशिक हवामानशास्त्र केंद्र, मुंबई यांनी 06 मे रोजी दिलेल्या सूचनेनुसार नांदेड जिल्ह्यासाठी 7 मे 2026 या एक दिवसासाठी यलो अलर्ट जारी केलेला आहे. या दिवशी जिल्ह्यात तुरळक ठिकाणी ताशी 40 ते 50 किमी वेगाने वादळी वारे वाहण्याची, विजेच्या कडकडाटासह व ढगांच्या गडगडाटासह मध्यम स्वरूपाचा पाऊस पडण्याची अधिक शक्यता वर्तविली आहे. या नैसर्गिक आपत्ती संदर्भात सर्व संबंधित यंत्रणा आणि नागरिकांनी खबरदारी घ्यावी, असे आवाहन जिल्हा प्रशासनाच्यावतीने करण्यात आले आहे. विजेच्या गडगडाटासह पावसाची पूर्वकल्पना असल्यास बाहेर जाणे टाळा. जर मोकळ्या जागेत असाल आणि जवळपास कुठल्याही सुरक्षित इमारतीचा आसरा नसेल तर सखल जागेत जाऊन गुडघ्यात डोके घालून बसा. आकाशात विजा चमकत असल्यास घरात किंवा सुरक्षित इमारतीत आश्रय घ्या. घराच्या बाल्कनी, छत अथवा घराबाहेरील ओट्यावर थांबू नका. आपण घरात असाल आणि घरातील विद्युत उपकरणे चालू असतील तर त्या वस्तू त्वरित बंद करा. तारांचे कुंपण, विजेचे खांब व इतर लोखंडी वस्तूंपासून दूर रहा. पाण्यात उभे असाल तर तात्काळ पाण्यातून बाहेर पडा.

### ३ हजार ५०० 'होम बेस्ड केअरगिव्हर' पदांसाठी भरती प्रक्रिया सुरू

नांदेड जिल्हा (स. गांवकरी) : नॅशनल स्किल डेव्हलपमेंट कॉर्पोरेशन (NSDC) आणि महाराष्ट्र शासनाच्या माध्यमातून इस्रायलमध्ये 'घरगुती केअरगिव्हर' (Home Based Caregiver) या पदासाठी ३ हजार ५०० उमेदवारांची मोठी भरती प्रक्रिया राबवली जात आहे. आरोग्य आणि सेवा क्षेत्रात करिअर करू इच्छिणाऱ्या महाराष्ट्रातील तरुणांसाठी ही एक सुवर्णसंधी असून, यासाठी 'महाराष्ट्र इंटरनॅशनल' https://maharashtrainternational.com या अधिकृत संकेतस्थळावर नोंदणी करणे आवश्यक आहे. या भरती प्रक्रियेत ९० टक्के महिला आणि १० टक्के पुरुष उमेदवारांची निवड केली जाणार आहे. अर्जदाराचे वय २५ ते ४५ वर्षांच्या दरम्यान असावे आणि किमान १० वी उत्तीर्ण पात्रता अनिवार्य आहे. शारीरिक पात्रतेनुसार उमेदवाराची उंची किमान १.५ मीटर आणि वजन ४५ किलो किंवा त्यापेक्षा जास्त असणे आवश्यक आहे. तसेच, उमेदवाराला इंग्रजी भाषेचे मध्यम स्तरावरील (Intermediate) ज्ञान असणे गरजेचे आहे.

### पगारा विना विकास कसा? जेजेएम-एसबीएम कर्मचाऱ्यांचा सवाल

नांदेड जिल्हा (स. गांवकरी) : ग्रामीण भागातील पाणीपुरवठा व स्वच्छता योजनांची अंमलबजावणी करणाऱ्या जल जीवन मिशन (JJM) आणि स्वच्छ भारत मिशन (ग्रामीण) (SBM-G) अंतर्गत कार्यरत कंत्राटी कर्मचाऱ्यांवर सध्या गंभीर आर्थिक संकट ओढवले आहे. अनेक महिन्यांपासून मानधन न मिळाल्याने कर्मचाऱ्यांमध्ये तीव्र असंतोष निर्माण झाला असून पगाराविना विकास कसा साध्य होणार? असा सवाल उपस्थित केला जात आहे. उपलब्ध माहितीनुसार, जल जीवन मिशनमधील कर्मचाऱ्यांचे सुमारे ५ ते ६ महिने, तर स्वच्छ भारत मिशनमधील कर्मचाऱ्यांचे ३ ते ४ महिने मानधन प्रलंबित आहे. मागील ७-८ महिन्यांत केवळ एकदाच मानधन मिळाल्याचे समोर आले आहे. परिणामी घरभाडे, शिक्षण, आरोग्य व दैनंदिन खर्च भागवणे कठीण झाले असून अनेकांना उधारीवर संसार चालवावा लागत आहे. राज्यातील या कर्मचाऱ्यांच्या योगदानामुळे आतापर्यंत ३८,८०५ गावे हागणदारीमुक्त अधिक  तर १४,४७२ गावे हर घर जल म्हणून घोषित झाली आहेत. मात्र, या यशामागील कर्मचाऱ्यांनाच आर्थिक असुरक्षिततेला सामोरे जावे लागत असल्याचे चित्र आहे. दरम्यान, महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरणाने १२ फेब्रुवारी २०२६ रोजी प्रलंबित मानधन अदा करण्याचे आदेश दिले होते, तर राज्य मानवाधिकार आयोगाने २५ मार्च २०२६ रोजी तात्काळ कार्यवाहीचे निर्देश दिले होते. तरीही अंमलबजावणीत विलंब होत असल्याने प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

### उष्मालाटेच्या पार्श्वभूमीवर खाजगी क्लासेससाठी आदेश निर्गमित

नांदेड जिल्हा (स. गांवकरी) : नांदेड जिल्ह्यात वाढत्या तापमानाची तीव्रता लक्षात घेवून उष्मालाटेमुळे कोणतीही आपत्कालीन परिस्थीती उद्भवू नये व विद्यार्थ्यांच्या आरोग्यावर प्रतिकूल परिणाम होवू नये यासाठी जिल्हाधिकारी तथा जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकारी राहुल कर्डिले यांनी आपत्ती व्यवस्थापन कायदा 2005 चे कलम 30 अन्वये नांदेड जिल्हा सीमा क्षेत्रातील सर्व खाजगी क्लासेसबाबत आदेश निर्गमित केले आहेत. नांदेड जिल्ह्यातील सर्व खाजगी क्लासेसनी सकाळी-सायंकाळच्या सत्रात किंवा ऑनलाईन-डिजीटल माध्यमातून क्लासेस घेण्यात यावेत. दुपारी 12 ते 4 या वेळेत कुठल्याही खाजगी क्लासेस संस्थानी व्यक्तीश: विद्यार्थ्यांना बोलावून क्लासेस घेवू नयेत. याबाबत वेळोवेळी हवामान खात्यामार्फत निर्गमित केल्या जाणाऱ्या हवामान इशाऱ्याची देखील नोंद घ्यावी.

# आनंदगड शैक्षणिक संकुलाचे प्रवेश मार्गदर्शन केंद्र सुरू

**विद्यार्थ्यांना करिअर निवडीसाठी मोठा आधार!**

अकोले : (स. गांवकरी)

आंतरभारती रूरल इंटरनॅशनल मेडिकल एज्युकेशन ट्रस्ट संचलित आनंदगड शैक्षणिक संकुलाचे प्रवेश मार्गदर्शन केंद्र अकोले शहरातील बाजारतळा शेजारी सुरू करण्यात आले असून विद्यार्थ्यांना व पालकांना करिअर मार्गदर्शनाचा मोठा आधार मिळणार असल्याची माहिती संस्थेचे संस्थापक अध्यक्ष रावसाहेब वाकचौरे यांनी दिली.

अकोले-संगमनेर परिसरातील अग्रगण्य शैक्षणिक संस्था म्हणून ओळख असलेल्या आनंदगड शैक्षणिक संकुलामध्ये धर्मवीर आनंद दिघे इंग्लिश मिडीयम स्कूल व ज्युनियर कॉलेज, आनंद गुरुकुल वसतिगृह, मातोश्री राधा फार्मसी कॉलेज, आनंदगड पॉलिटेक्निक कॉलेज, मातोश्री गंगूबाई शिंदे अक्युपंक्चर कॉलेज या विविध अभ्यासक्रमांसाठी शैक्षणिक वर्ष २०२६-२७ चे प्रवेश सुरू झाले आहेत. या पार्श्वभूमीवर इयत्ता १० वी व १२ वी नंतर विद्यार्थ्यांना योग्य अभ्यासक्रम निवडता यावा यासाठी हे विशेष प्रवेश मार्गदर्शन केंद्र सुरू करण्यात आले आहे.





या केंद्रात विद्यार्थ्यांसाठी ऑनलाईन प्रवेश फॉर्म भरण्याची संगणकीय सुविधा, विविध शाखांचे महत्त्व समजावून सांगणारे इंटरॅक्टिव्ह व्हिडिओ पॅनल, तसेच अभ्यासक्रमनिहाय माहिती उपलब्ध करून देण्यात आली आहे. इयत्ता १० वी नंतर सिव्हिल, मेकॅनिकल, इलेक्ट्रिकल, इलेक्ट्रॉनिक्स, कॉम्प्युटर इंजिनिअरिंग, आर्टिफिशियल इंटेलिजन्स व मशीन लर्निंग अशा पॉलिटेक्निक शाखांबाबत सविस्तर मार्गदर्शन केले जाणार आहे. तसेच प्रवेश प्रक्रिया, आवश्यक कागदपत्रे, शिष्यवृत्ती योजना, रोजगाराच्या संधी व संस्थेतील सुविधा याबाबत माहिती दिली जाणार आहे.

इयत्ता १२ वी नंतर डी. फार्मसी, बी. फार्मसी व अक्युपंक्चर थेरपी या अभ्यासक्रमांसंदर्भातही विद्यार्थ्यांना रोजगाराभिमुख मार्गदर्शन उपलब्ध करून दिले जाणार आहे.

संस्थेचे संस्थापक सचिव डॉ. अनिल रहाणे, संचालक सौ. सुप्रिया वाकचौरे, सौ. गीता रहाणे, शिवराज वाकचौरे, अक्षय रहाणे, प्राचार्य किरण चौधरी, प्राचार्या डॉ. पल्लवी फलके, प्रा. प्राजक्ता आंबरे-सावंत व को-ऑर्डिनेटर प्रा. विद्याचंद्र सातपुते यांनी १० वी, १२ वी सायन्स तसेच आयटीआय उत्तीर्ण विद्यार्थ्यांनी योग्य अभ्यासक्रम निवडून स्वतःच्या पायावर उभे राहण्यासाठी या संधीचा लाभ घ्यावा, असे आवाहन केले आहे.

उद्योजक माणिकराव डावरे यांनी या प्रवेश मार्गदर्शन केंद्रास सदिच्छा भेट देऊन विद्यार्थ्यांसाठी अशा केंद्राची नितांत गरज असल्याचे सांगितले. विद्यार्थ्यांच्या भविष्यासाठी उपयुक्त उपक्रम हाती घेतल्याबद्दल त्यांनी संस्थापक रावसाहेब वाकचौरे व डॉ. अनिल रहाणे यांचे अभिनंदन करून शुभेच्छा दिल्या.

## तुम्ही करा रडल्या वानी मि करतोय मारल्या वनी

नायगाव : (स. गांवकरी)

- नायगाव तालुक्यातील हादितील अवैध वाळू चोरिला
- ईळेगाव येथील चोरी करणाऱ्याना कोण जबाबदार

नायगाव तालुक्यातील ईळेगाव व वेळी व मातळा नायगाव तालुक्यातील बरबडा हादितील असलेल्या गावांतील मागील काही दिवसांपासून रात्रीच्या वेळी व दिवसा वाळू , चोरी करणाऱ्याना वाळू माफियांना रान मोकळी केलीय नायगाव तालुक्यातील महसूल प्रशासनाचा यांचा आशिर्वाद आहे अशी चर्चा दपक्या आवाजात सुरू आहे. तुम्ही करा रडल्या वानी मि करतोय मारल्या वनी उमरी तालुक्यातील व ईळेगाव व येळी येथील वाळु माफीयांनी बरबडा हाद चोरी व तस्करी वाढली आहे. या माफियांना ना कोणाचा धाक राहिला , ना कुणाची भिंती महसूल विभागाच्या वाळू माफिया रात्रीच्या दिवसाढवळ्या बरबडा वाडी भागातून चालू आहे वेळी वाळूची चोरी करून खुलेआम वाहतूक करत आहेत. बरबडा हादितील ईळेगाव येथील व येळी , मारतळा येथील लोहा तालुक्यातील वाळू रात्रीला व मोठ्या प्रमाणात नायगाव तालुक्यातील बरबडा व बरबडा वाडी भागातून असलेल्या गावात नायगाव तसिलचा अनागोंदी कारभारामुळे वाळू व अवैध वाहतूक होत आहे. ती वाळू टिप्परमधून वाहतूक करुन विक्री केली जात आहे.गोदावरी पात्रातून बोटिंग मुळे.बरबडा व परिसरातील शेतकऱ्यांच्या मोटारी नुकसान केले जात आहे सर्व बाबींकडे कोणी लक्ष देण्यास तयार नाही दिवसाढवळ्या वाळू काढल्या जात आहे.

चोरीने काढलेली वाळू नायगावच्या तहसीलदार यांनी चोरट्या मार्गाने वाळूचे उत्खनन करून अवैध वाहतूक करणाऱ्यांना रान मोकळे सोडले आहे.

## भर उन्हात सेवानिवृत्त पेन्शनधारकांचे धरणे आंदोलन

ठाणे : (स. गांवकरी)

गेले दोन महिने हक्काची पेन्शन न मिळाल्याने जगायचे कसे ? असा प्रश्न महाराष्ट्र जीवन प्राधिकरणातील सेवानिवृत्त वयोवृद्ध कर्मचाऱ्यां समोर उभा राहिला आहे. पेन्शनच्या मागणीसाठी बुधवारी दुपारी महाराष्ट्र जीवन प्राधिकरणातील ठाणे शहरातील कार्यालयाबाहेर या कर्मचाऱ्यांनी भर उन्हात धरणे आंदोलन केले. राज्यातील तब्बल १४ हजार सेवानिवृत्त कर्मचारी हे पेन्शनपासून वंचित आहेत. त्यामुळे त्यांना विविध आर्थिक अडचणींना सामोरे जावे लागत असल्याची नाराजी या वयोवृद्ध कर्मचाऱ्यांनी व्यक्त केली. शासनाकडे वारंवार पाठपुरावा करुनही आमच्या मागण्यांकडे पाठ फिरवली असल्याचे त्यांनी म्हटले आहे.




**जगायचे कसे? शासनाला विचारला प्रश्न**

महाराष्ट्र जीवन प्राधिकरणातील सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांचे तात्पुरते लेखाशिर्ष, महालेखाकार, मुंबई यांच्या कार्यालयाने गोठविल्यामुळे माहे मार्च २०२६ पासून सेवानिवृत्ती वेतन मिळालेले नाही. त्यामुळे प्राधिकरणातील सेवानिवृत्ती कर्मचारी मोठ्या आर्थिक संकटात सापडलेले आहे. त्याचा रोष व्यक्त करण्यासाठी महाराष्ट्र जीवन प्राधिकरण संघर्ष कृती समितीच्यावतीने राज्यातील संपूर्ण मजीप्रा सेवानिवृत्त कर्मचारी हे मजीप्राच्या विविध कार्यालयासमोर धरणे देऊन निवेदनाच्या माध्यमातून शासनाचे लक्ष वेधले. माहे मार्च २०२६ पासून मजीप्रा कर्मचाऱ्यांना २०२६ -२७ च्या अर्थसंकल्पात ४०० कोटी रुपयांची तरतूद असून सुद्धा सेवानिवृत्ती वेतन मिळालेली नाही ही खेदाची बाब असल्याचे कृती समितीच्यावतीने सांगण्यात आले. आज अनेक सेवानिवृत्त कर्मचारी हे निव्वळ पेन्शनवर अवलंबून असून त्यांना औषधोपचारासाठी पैसे नाही त्यामुळे ते हवालदिल झाले आहे, त्यांची प्रकृती बिघडलेली आहे अशी व्यथा देखील त्यांनी व्यक्त केली. आज आम्हाला एक दिवस धरणे आंदोलन करावे लागत आहे, पेन्शन लवकर न मिळाल्यास हजारोंच्या संख्येने पेन्शनधारक आझाद मैदानावर उपोषण करतील असा इशारा कृती समितीचे सदस्य सिद्धार्थ रोकडे यांनी दिला आहे.

## नरसापूर प्रकरणातील आरोपीवर कारवाईसाठी आंदोलन

ठाणे : (स. गांवकरी)

भोर तालुक्यातील नरसापूर येथे घडलेल्या अत्यंत धक्कादायक आणि अमानवीय घटनेने संपूर्ण राज्यभर संतापाची लाट उसळली आहे. चार वर्षाच्या चिमुरडीवर लैंगिक अत्याचार करून तिची हत्या केल्याच्या घटनेचा ठाण्यात शिवसेनेच्या वतीने आज जोरदार निषेध व्यक्त करण्यात आला. या प्रकरणातील आरोपीला तात्काळ अटक करून कठोरात कठोर शिक्षा देण्याची मागणी आंदोलकांकडून करण्यात आली. ठाणे महापालिका मुख्यालयासमोर शिवसेनेच्या महिला आघाडीच्या वतीने तीव्र आंदोलन करण्यात आले. महापौर शर्मिला पिंपळोलकर व शिवसेना ठाणे जिल्हा महिला संघटक मिनाक्षी शिंदे यांच्या नेतृत्वाखाली झालेल्या या आंदोलनात शिवसेनेच्या सर्व नगरसेविका व शिवसेना महिला आघाडीच्या पदाधिकारी मोठ्या सहभागी झाल्या होत्या. संतप्त महिलांनी या घटनेचा तीव्र शब्दांत




निषेध व्यक्त करत, "अशा विकृत प्रवृत्तींना समाजात स्थान नाही," असे स्पष्ट मत मांडले. राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याकडे या प्रकरणाचा जलदगतीने तपास करून आरोपीवर कठोर कारवाई करण्याची मागणी त्यांनी आंदोलना दरम्यान केली. तसे निवेदन मुख्यमंत्री व उपमुख्यमंत्र्यांना देणार असल्याचे स्पष्ट केले. यावेळी आंदोलकांनी आरोपीच्या पुतळ्याला जोडे मारुन त्याचे दहन केले. ज्याप्रमाणे बदलापूर येथील प्रकरणात पीडीत कुटुंबाला न्याय मिळाला, त्याचप्रमाणे नरसापूर प्रकरणातील पीडीतांच्या कुटुंबियांना न्याय मिळवून द्यावा अशी संपूर्ण जनतेची मागणी असल्याचे महापौर शर्मिला पिंपळोलकर यांनी नमूद केले. जिल्हा महिला आघाडी तसेच महिला संघटक मिनाक्षी शिंदे यांनीही पीडित कुटुंबाला न्याय मिळालाच पाहिजे, अशी ठाम भूमिका व्यक्त केली.

प्रसंगी शिवसेना ठाणे उपजिल्हाप्रमुख वंदना डोंगरे, विभागप्रमुख पुजा लोंढे, पुजा वाघ तसेच शिवसेनेच्या सर्व नगरसेवक व महिला आघाडीच्या पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.

## पशुपालकांना १०० टक्के अनुदानावर चारा बियाणे


नांदेड जिल्हा : (स. गांवकरी)

प्रतिनिधी चारा बियाण्यांवरील 100 टक्के अनुदानामुळे पशुपालकांचा खर्च कमी होऊन त्यांना मोठा दिलासा मिळणार आहे. त्यामुळे पशुपालकांनी चारा बियाण्यांवरील अनुदानासाठी विहित वेळेत अर्ज सादर करावेत, असे आवाहन जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांनी केले आहे. जिल्ह्यातील दूग्ध उत्पादनाच्या वाढीस चालना देण्यासाठी विदर्भ व मराठवाडा दूग्ध विकास प्रकल्प टप्पा- 2 राबविण्यात येत आहे. दुधाळ जनावरांसाठी दर्जेदार चारा उपलब्ध व्हावा, या दृष्टिकोनातून पशुपालकांना मान्सून पूर्व सुधारित जातीचे वैरण बियाणे पेरण्यासाठी जिल्ह्यामध्ये विदर्भ व मराठवाडा दूग्ध विकास प्रकल्प अंतर्गत शंभर टक्के अनुदानावर शुगर ग्रेझ, स्पीड फीड ज्वारी व सुधारित मका बियाणे वाटप करण्यात येणार आहे. या योजनेचा लाभ घेण्यासाठी सरकारी व खाजगी दूध डेअरी तसेच दूध उत्पादक संघांना दूध पुरवठा करणारे पशुपालक पात्र ठरणार आहेत. इच्छुक लाभार्थ्यांनी www.vmddp.com या संकेतस्थळावर जाऊन ऑनलाइन अर्ज करणे आवश्यक आहे. अधिक माहितीसाठी जवळच्या पशुवैद्यकीय दवाखान्याशी संपर्क साधावा. अर्जासाठी आधार कार्ड, रेशन कार्ड, किमान एक एकर जमिनीचा सातबारा उतारा, पशुवैद्यकीय अधिकाऱ्याचे दूध पुरवठा प्रमाणपत्र तसेच किमान तीन दुधाळ जनावरांचे टॅग क्रमांक आवश्यक आहेत. दर्जेदार चाऱ्यामुळे दुभत्या जनावरांना सकस आहार मिळणार असून, यामुळे पशुधनाचे आरोग्य सुधारण्यास आणि दूध उत्पादन वाढीस मदत होणार असल्याचे पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय विभागाचे जिल्हा उपआयुक्त डॉ. सखाराम बी. खुणे यांनी सांगितले.

## पुणे मिसिंग लिंक मुळे महत्त्वाचा अडथळा दूर

पुणे : (स. गांवकरी)

गुलाम झिया, आंतरराष्ट्रीय भागीदार, वरिष्ठ कार्यकारी संचालक – संशोधन, सल्लागार सेवा, पायाभूत सुविधा आणि मूल्यांकन, नाईट फ्रँक इंडिया यांनी सांगितले, "पुणे मिसिंग लिंकचे उद्घाटन हे भारतातील सर्वाधिक वर्दळीच्या वाहतूक मार्गांपैकी एका मार्गाचे महत्त्वपूर्ण उन्नयन दर्शवते. मुंबई–पुणे द्रुतगती मार्गावरील हा 13.3 किमी वळणमार्ग दीर्घकाळापासून असलेला अडथळा दूर करतो, प्रवासाचा वेळ जवळपास 30 मिनिटांनी कमी करतो आणि धोकादायक घाट विभागातून वाहतूक वळवून सुरक्षितता व कार्यक्षमता दोन्ही सुधारतो. या प्रकल्पाचे प्रमाण 'टायगर व्हॅली'वरील भारतातील सर्वात लांब आणि उंच दोरआधारित पूलाच्या समावेशामुळे अधिक अधोरेखित होते." ते पुढे म्हणाले, "स्थावर मालमत्तेच्या दृष्टीकोनातून, अशा प्रकारची पायाभूत सुविधा ही बाजाराच्या उत्क्रांतीसाठी महत्त्वाची



- स्थावर मालमत्ता आणि गोदाम व्यवस्थेसाठी नवीन वाढीचा मार्ग खुला

प्रेरक शक्ती ठरते. मुंबई आणि पुणे यांच्यातील सुधारलेली जोडणी या दोन शहरांमधील एकात्मता अधिक मजबूत करेल आणि या मार्गावर निवासी व व्यावसायिक विकासासाठी नवीन संधी निर्माण करेल. यामुळे गुंतवणुकीसाठी उपलब्ध क्षेत्राचा विस्तार होईल, खरेदीदारांचा आत्मविश्वास वाढेल आणि नवीन वाढीची केंद्रे उदयास येण्यास मदत होईल. गोदाम व्यवस्था आणि पुरवठा साखळी क्षेत्रालाही याचा मोठा फायदा होण्याची शक्यता आहे.

## जिल्हा परिषद शाळा होणार ' मॉडेल स्कूल '

### मोठ्या उत्साहात शाळेचा भूमिपूजन सोहळा संपन्न

ओतूर : (स. गांवकरी)

जुन्नर तालुक्यातील धोलवड येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेच्या नवीन इमारतीच्या बांधकामाचा भूमिपूजन सोहळा बाळासाहेब तथा लक्ष्मण बबन पाटील नलावडे आणि मान्यवरांच्या हस्ते आणि वेदमंत्रांच्या घोषात संपन्न झाला. धोलवड हे गाव शैक्षणिक, सामाजिक, कृषी या सर्व क्षेत्रात पंचक्रोशीत नावाजलेले गाव आहे. भावी पिढी घडावी या उद्देशाने गावातील सर्व ग्रामस्थ सातत्याने शिक्षण क्षेत्रामध्ये विद्यार्थ्यांना विविध सुविधा पुरवण्यासाठी सातत्याने प्रयत्नशील असतात त्याचाच एक भाग म्हणून विद्यार्थ्यांना पायाभूत शिक्षणाच्या सर्व अत्याधुनिक सुविधा उपलब्ध व्हाव्यात या हेतूने मराठी शाळेसाठी अत्याधुनिक सामग्रीने संपन्न अशी ' मॉडेल स्कूल' ची उभारणी करण्याचा मानस गावकऱ्यांनी



व्यक्त केला आणि त्यासाठी शाळेच्या इमारतीचे भूमिपूजन मान्यवरांच्या उपस्थितीमध्ये संपन्न करण्यात आले.

या कार्यक्रमासाठी ग्रामशिक्षण सेवा मंडळाचे आधारस्तंभ मार्गदर्शक शिवाजीराव नलावडे, अध्यक्ष भालचंद्र शेठ नलावडे, धोलवड गावचे सरपंच वैभव नलावडे,भोलेनाथ नलावडे, बाबाजी मुंढे, उपसरपंच सोमनाथ नलावडे, मंगल नलावडे, पोर्णिमा भोर, धोलवड ट्रस्टचे उपाध्यक्ष शिवाजी सावळेराम नलावडे, माजी अध्यक्ष एकनाथ नलावडे पोलीस पाटील गौरीताई काळे, अमृतकुंभ पतसंस्थेचे अध्यक्ष प्रदीप मुंढे, शिवनेरी विद्यालयाचे मुख्याध्यापक समीर वामन,जि.प.मुख्याध्यापक कल्पना घोलप, संतोष पन्हाळे, सुनिता ढमाले, नूतन रोगटे , ज्येष्ठ नागरिक संघाचे अध्यक्ष गुलाब पाटील नलावडे, कैलास नलावडे,दामोदर नलावडे, खंडू नलावडे, बाळासाहेब नलावडे, पांडुरंग नलावडे, खंडू मुंढे, दत्तात्रय नलावडे, हरी नलावडे, किसन नलावडे,किसन मुंढे, रोहित मुंढे, कांचनलता नलावडे,प्रांजल नलावडे, सुवर्णा नलावडे, सुरेश नलावडे, किशोर नलावडे, गणेश नलावडे, ज्ञानेश्वर जाधव,प्रकाश नलावडे, रमेश लवांडे, रमेश काळे, सुभाष मुंढे, ज्ञानेश्वर मुंढे, जालिंदर नलावडे, उमेश नलावडे इत्यादी ग्रामस्थ ,महिला, विविध संस्थांचे पदाधिकारी उपस्थित होते.

**ठेकेदार पंकज हांडे यांनी कामाची पद्धत, कामाचा कालावधी, कामाचे अंदाजित रक्कम याविषयी उपस्थितांना माहिती दिली. त्याचप्रमाणे होऊ घातलेल्या प्रकल्पाविषयीची माहिती शिवनेरी विद्यालयाचे मुख्याध्यापक समीर वामन आणि जिल्हा परिषद प्राथमिक शाळा चे मुख्याध्यापक कल्पना घोलप यांनी उपस्थितांना दिली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन विष्णुपंत नलावडे यांनी केले तर आभार प्रदर्शन सरपंच वैभव नलावडे यांनी केले.**

# थोडक्यात पण महत्वाचे



## परिचर संवर्गातील २३ कर्मचाऱ्यांना आरोग्य सेवक (पुरुष) पदावर पदोन्नती

ठाणे (स. गांवकरी) : जिल्हा परिषद ठाणे येथे परिचर (गट ड) संवर्गातून आरोग्य सेवक पुरुष (गट क) संवर्गात २३ कर्मचाऱ्यांना पदोन्नती देण्यात आली. पदोन्नती आदेशांचे वितरण जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी रणजित यादव यांच्या हस्ते करण्यात आले. या प्रसंगी उपमुख्य कार्यकारी अधिकारी अविनाश फडतरे, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. गंगाधर परगे तसेच सामान्य प्रशासन विभाग व आरोग्य विभागातील अधिकारी व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. पदोन्नती आदेश वितरणानंतर सर्व मान्यवरांनी पदोन्नती कर्मचाऱ्यांचे अभिनंदन करून त्यांना नवीन जबाबदाऱ्या पार पाडताना शासनाच्या धोरणांप्रती निष्ठा राखण्याचे तसेच ग्रामीण जनतेच्या आरोग्य सेवेसाठी प्रामाणिकपणे व सचोटीने कार्य करण्याचे मार्गदर्शन केले. ग्रामीण भागातील नागरिकांना गुणवत्तापूर्ण व वेळेवर आरोग्य सेवा उपलब्ध करून देण्यासाठी पदोन्नत कर्मचाऱ्यांनी आपली भूमिका अधिक प्रभावीपणे पार पाडावी, असेही त्यांनी नमूद केले. सदर प्रसंगी पदोन्नत कर्मचाऱ्यांच्या वतीने प्रमोद पंढरीनाथ घोलप यांनी मनोगत व्यक्त केले. आपल्या भाषणात त्यांनी सांगितले की, "आजचा दिवस आमच्या सेवाकाळातील अत्यंत महत्त्वाचा आणि आनंदाचा आहे. शिपाई (वर्ग-४) संवर्गातून आरोग्य सेवक (पुरुष) पदावर पदोन्नती मिळाल्यामुळे आम्हा सर्वांना नव्या स्वरूपाचे कामकाज करण्यास मिळणार आहे. बऱ्याच काळापासून प्रलंबित असलेली पदोन्नती मुख्य कार्यकारी अधिकारी रणजित यादव यांच्या विशेष प्रयत्नांमुळे यशस्वी झाले तसेच उपमुख्य कार्यकारी अधिकारी व जिल्हा आरोग्य अधिकारी यांच्यासह सामान्य प्रशासन व आरोग्य विभागातील सर्व अधिकारी व कर्मचाऱ्यांचे आम्ही मनःपूर्वक आभारी आहोत." पदोन्नत कर्मचाऱ्यांनी नवीन पदाची जबाबदारी पूर्ण निष्ठा, प्रामाणिकपणा व कष्टपूर्वक पार पाडण्याची ग्वाही दिली. तसेच जिल्हा परिषद ठाणेच्या प्रगतीसाठी व उद्दिष्टपूर्तीसाठी अधिक जोमाने कार्य करण्याचा निर्धार व्यक्त केला. कार्यक्रमाचे वातावरण उत्साहपूर्ण व प्रेरणादायी होते.

## ओंकार शुगर ग्रुपकडून १७ साखर कारखान्यांचे पुनरुज्जीवन



श्रीगोंदा (स. गांवकरी) : बाबुराव बोत्रेपाटील यांच्या नेतृत्वाखाली ओंकार शुगर ग्रुपने महाराष्ट्र, तेलंगणा आणि कर्नाटक या तीन राज्यांतील बंद किंवा अडचणीत सापडलेले 17 साखर कारखाने पुनर्जीवित केले असून सुमारे 11 लाख ऊस उत्पादक शेतकरी, कामगार आणि ऊसतोडणी मजुरांना आर्थिक न्याय दिला आहे, अशी माहिती संचालक ओमराजे बोत्रेपाटील यांनी दिली. सध्या शेतकऱ्यांचे एका महिन्याचे उसबिल प्रलंबित असून ते लवकरच अदा करण्यात येईल. तसेच शेतकरी व ऊस वाहतूकदारांची कोणतीही देयके थकीत ठेवली जाणार नाहीत, कुणाचाही एक रुपयाही बाकी राहणार नाही, असे त्यांनी स्पष्ट केले. प्रसिद्धीपत्रकात पुढे नमूद करण्यात आले आहे की, या 17 साखर कारखान्यांमधून 75 लाख मेट्रिक टन ऊस गाळप करण्यात आला. यामध्ये शेतकऱ्यांना 1,830 कोटी रुपयांचे उसबिल, तर ऊसतोडणी मजूर व वाहतूकदारांना 710 कोटी रुपये अदा करण्यात आले आहेत. तसेच 18 हजार साखर कामगारांना पुन्हा रोजगार उपलब्ध करून देण्यात आला असून या प्रक्रियेत सुमारे 6 हजार कोटी रुपयांची उलाढाल झाली आहे. ग्रामीण अर्थकारणाला चालना देण्याचा हा प्रयत्न असल्याचेही त्यांनी सांगितले. येत्या गाळप हंगामात 21 साखर कारखाने चालवून 1 कोटी मेट्रिक टन ऊस गाळप करण्याचे आणि सुमारे 7 हजार कोटी रुपयांची उलाढाल करण्याचे उद्दिष्ट आहे. केंद्र सरकारच्या नवीन धोरणानुसार पेट्रोल-डिझेलमध्ये 33 टक्के इथेनॉल मिश्रणास परवानगी मिळण्याची शक्यता असून, त्यानुसार ओंकार ग्रुपने सर्व मोलॅसेस साठवून ठेवले आहेत. यामधून सुमारे 600 कोटी रुपयांचे उत्पन्न अपेक्षित असल्याचेही बोत्रेपाटील यांनी नमूद केले.

## जगण्यासाठी धडपड; पैशा अभावी थांबली किडनी प्रत्यारोपण शस्त्रक्रिया

श्रीगोंदा (स. गांवकरी) : श्रीगोंदा येथील संदीप बजरंग घोडके (वय ४०) यांच्यावर आलेल्या गंभीर आजाराने त्यांच्या कुटुंबासमोर मोठे संकट उभे केले आहे. २०२३ पासून दोन्ही किडन्या निकामी झाल्याने ते जीवघेण्या आजाराशी झुंज देत आहेत. त्यांच्या कुटुंबात पत्नी, दोन लहान मुली आणि एक मुलगा असून, तेच कुटुंबाचा एकमेव आधार आहेत. शरीर साथ देत नसतानाही मुलांच्या संगोपनासाठी ते काम करत राहिले. मात्र, प्रकृती अधिक खालावल्याने डॉक्टरांनी किडनी प्रत्यारोपण (ट्रान्सप्लांट) करण्याचा सल्ला दिला होता. त्यानुसार २४ एप्रिल २०२६ रोजी छत्रपती संभाजीनगर येथील रुग्णालयात शस्त्रक्रिया निश्चित झाली होती. परंतु, लाखो रुपयांचा खर्च उभा राहू न शकल्याने ही शस्त्रक्रिया ऐनवेळी पुढे ढकलावी लागली. माध्यमांशी बोलताना संदीप घोडके यांनी आपल्या भावनांना वाट मोकळी करून दिली. "माझ्या जीवाची मला भीती नाही, पण माझ्या मुलांचं भवितव्य काय होईल, ही चिंता सतावत आहे," असे ते म्हणाले. दरम्यान, काही मित्र व सामाजिक संस्थांनी मदतीचा प्रयत्न सुरू केला असला तरी आवश्यक निधी अद्याप अपुरा आहे.


### जाहीर नोटीस

**तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी अकोले यांचे कार्यालय ता. अकोले, जि. अहिल्यानगर यांचे न्यायालयात...**

क्र.कावि/जन्म/मृत्यु नोंद/२०/२०२६ अकोले दि. ०६/०४/२०२६

तमांम नागरिकांस कळविण्यात येते की,

ज्याअर्थी अर्जदार **श्री. हरीभाऊ विठ्ठल गायकर, रा. ब्राम्हणवाडा**, ता. अकोले, जि. अहिल्यानगर यांनी जन्म मृत्यु नोंदणी अधिनियम १९६९ कलम १३(३) अन्वये **अर्जदार यांची आई कै. बजाबाई विठ्ठल गायकर यांचा मृत्यू दि. १६/०८/२०२४** रोजी **मौजे ब्राम्हणवाडा** येथे झाला असुन त्यांच्या **आईच्या** मृत्यूची नोंद **ग्रामपंचायत कार्यालय ब्राम्हणवाडा**, ता.अकोले यांचे जन्म–मृत्यु रजिस्टरला नोंद आदेश होणेकामीचा अर्ज मे तहसिल कार्यालय येथे दाखल केला आहे.

तरी **श्री. हरीभाऊ विठ्ठल गायकर, रा. ब्राम्हणवाडा**, ता.अकोले जि.अहिल्यानगर **अर्जदार यांची आई कै. बजाबाई विठ्ठल गायकर यांचा मृत्यू दि. १६/०८/२०२४** रोजी **मौजे ब्राम्हणवाडा** येथे झाला असल्याची नोंद **ग्रामपंचायत कार्यालय ब्राम्हणवाडा**, ता. अकोले येथे मृत्यूची नोंद होण्याबाबत कोणाची काही हरकत अगर तक्रार असल्यास त्यांनी सदर नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ३० दिवसाचे आत योग्य त्या कागदपत्राच्या पुराव्यांसह हरकत मे. कोर्टासमोर हजर होऊन पुराव्या निशी दाखल करावी अन्यथा सदर मुदतीत कोणाचीही कोणतीही हरकत प्राप्त न झाल्यास सदर मृत्यूची नोंद करण्यास कोणाचीही हरकत नाही, असे समजुन मे. न्यायालय पुढील योग्य तो आदेश पारीत करण्यात येईल. तदनंतर कोणाचीही कोणतीही तक्रार ग्राहय धरली जाणार नाही याची नोंद घ्यावी.

आज दि. ०६/०४/२०२६ रोजी सही व शिक्क्यानिशी दिले असे.

**कामगिरी क्लर्क**

**हुकूमावरुन,**
**तहसिलदार तथा**
**कार्यकारी दंडाधिकारी, अकोले**


# मनाठा तांदूळ जप्ती प्रकरणात प्रशासकीय तडजोडीची चर्चा

## संशयास्पद अहवालाने रेशन माफियांचे फावले

तामसा : (स. गांवकरी)

हदगाव तालुक्यातील मनाठा परिसरात २९ टन तांदळाने भरलेला ट्रक जप्त केल्याच्या घटनेने गेल्या काही दिवसांपासून संपूर्ण जिल्ह्यात खळबळ उडवून दिली होती. मात्र, आता या प्रकरणाला एक अत्यंत धक्कादायक वळण मिळाले असून, हा तांदूळ रेशनचा नसल्याचा अहवाल प्रशासनाकडून प्राप्त झाला आहे. या 'क्लीन चिट'मुळे संबंधित ट्रक सोडून देण्यात आला असला तरी, या संपूर्ण प्रक्रियेत पोलीस आणि महसूल प्रशासनाने संगनमत करून मोठी 'अर्थपूर्ण' तडजोड केल्याची खळबळजनक चर्चा आता विश्वसनीय सूत्रांकडून समोर येत आहे. २९ एप्रिल रोजी सकाळी मनाठा पाटी परिसरात पोलिसांनी MH-26 BE-7421 क्रमांकाचा ट्रक संशयावरून ताब्यात घेतला होता. त्यावेळी खुद्द पोलीस प्रशासनानेच हा तांदूळ सार्वजनिक वितरण प्रणालीतील म्हणजेच रेशनचा असल्याचा दाट संशय व्यक्त केला होता. मात्र, त्यानंतर कोणत्याही प्रकारचा गुन्हा दाखल न होता आणि चौकशी पूर्ण होण्याआधीच पडद्यामागून हालचाली सुरू झाल्याचा आरोप आता नागरिकांमधून केला जात आहे. या प्रकरणातील सर्वात संशयास्पद बाब म्हणजे, ज्या मार्गावर ही मोठी कारवाई झाली, त्या मनाठा पोलीस ठाण्यासमोरचे मुख्य सीसीटीव्ही कॅमेरे गेल्या काही दिवसांपासून बंद असल्याची माहिती सूत्रांकडून मिळाली आहे. रेशन माफियांच्या तस्करीत सीसीटीव्ही कॅमेरे हा मोठा अडथळा ठरू शकत



असल्याने, ते जाणीवपूर्वक बंद ठेवण्यात आले होते की काय, असा प्रश्न आता उपस्थित होत आहे. इतक्या महत्त्वाच्या ठिकाणी कॅमेरे बंद असणे आणि त्यानंतर तांदळाचा अहवाल रेशनचा नसल्याचा येणे, हा केवळ योगायोग नसून रेशन माफिया आणि प्रशासनातील काही भ्रष्ट अधिकाऱ्यांनी मिळून रचलेला हा एक मोठा बनाव असल्याचे बोलले जात आहे. गरिबांच्या हक्काचा तांदूळ काळ्या बाजारात चढ्या दराने विकणाऱ्या टोळ्या या भागात सक्रिय असताना, त्यांना अशा प्रकारे प्रशासनाकडून अभय मिळणे हे धक्कादायक मानले जात आहे.

दोन वर्षांपूर्वी देखील हदगाव परिसरात अशाच प्रकारे तांदळाचा ट्रक पकडला होता, मात्र त्या प्रकरणाचे पुढे काय झाले हे अद्याप कोणालाही समजले नाही. आता याही प्रकरणात तोच पॅटर्न राबवण्यात आल्याचे दिसून येत असून, पैशांची मोठी देवाणघेवाण करून हा ट्रक सुरक्षितपणे बाहेर काढण्यात आल्याची चर्चा परिसरात रंगली आहे. रेशन माफियांच्या या मोठ्या रॅकेटला वरिष्ठ स्तरावरून कोणाचे पाठबळ मिळत आहे, याची आता सखोल चौकशी होणे गरजेचे आहे. प्रशासनाकडून जरी कागदोपत्री हा तांदूळ रेशनचा नसल्याचा दावा केला जात असला, तरी या संपूर्ण प्रकरणाची पारदर्शकता संशयाच्या भोवऱ्यात सापडली आहे. जर रक्षकच माफियांचे हातमिळवणी करत असतील, तर सर्वसामान्यांच्या हक्काचे संरक्षण कोण करणार, असा संतप्त सवाल आता हदगाव तालुक्यातील जनतेतून विचारला जात आहे.

## अनुष्का झिटे संस्थेत प्रथम; पाचही विभागांत अव्वल



श्रीगोंदा : (स. गांवकरी)

श्रीमंत राजमाता विजयाराजे शिंदे कन्या विद्यालय, श्रीगोंदा येथे इयत्ता नववीत शिकणारी कु. अनुष्का नितीन झिटे हिने कर्मवीर विद्या प्रबोधिनी प्रमाणपत्र परीक्षेत १४० गुण मिळवत रयत शिक्षण संस्थेच्या पाचही विभागांत प्रथम क्रमांक पटकावला. या यशाबद्दल तिला पाच हजार रुपयांचे रोख पारितोषिक प्रदान करण्यात आले. अनुष्काच्या या उल्लेखनीय यशामुळे कन्या विद्यालयाच्या गुणवत्तेच्या आलेखात आणखी भर पडली आहे. तिला विभागप्रमुख श्री. विक्रम वाघ तसेच परीक्षा विभाग प्रमुख श्री. चंद्रशेखर उदार आणि श्री. गणेश फडताळे यांचे मार्गदर्शन लाभले. या यशाबद्दल रयत शिक्षण संस्थेच्या मॅनेजिंग कौन्सिलचे सदस्य श्री. बाबासाहेब भोस, जनरल बॉडी सदस्य श्री. कुंडलिकराव दरेकर, उत्तर विभागीय अधिकारी श्री. नवनाथ बोडखे, सहाय्यक विभागीय अधिकारी श्री. बाबासाहेब नाईकवाडी व श्री. प्रमोद तोरणे, गुणवत्ता कक्ष प्रमुख श्री. काकासाहेब वाळुंजकर, विद्यालयाच्या मुख्याध्यापिका श्रीम. वर्षा भोईटे, पर्यवेक्षक श्री. बाळासाहेब शिंदे, गुरुकुल प्रमुख श्री. किरण शिंदे तसेच सर्व समिती अध्यक्ष व सदस्यांनी तिचे अभिनंदन केले. अनुष्काच्या या यशाबद्दल परिसरातून तिच्यावर कौतुकाचा वर्षाव होत आहे.

## चऱ्होली खुर्द मध्ये पाईपचे कंपनी गोडाऊनला आग

आळंदी : (स. गांवकरी)

येथील आळंदी वडगाव रस्त्यावरील साई गार्डन मंगल कार्यालयाच्या दक्षिणेला असलेल्या पाईपच्या कंपनीत साहित्यास शॉक सर्किट मुळे लागलेल्या आहेत प्रचंड नुकसान झाले या घटनेत सुदैवाने कोणतीही जीवित हानी झाली नाही मात्र मोठ्या प्रमाणात वित्त आणि होऊन कंपनीचे प्रचंड नुकसान झाले. बुधवारी दुपारी साडेतीनशे सुमारास लागलेली आग सुमारे अडीच तासांच्या परिश्रमपूर्वक प्रयत्नानंतर विजविण्यात अग्निशामन दलाच्या जवानांना यश आले यासाठी पिंपरी चिंचवड महानगर परिषद अग्निशमन विभाग पीएमआरडीए अग्निशमन विभाग यांच्या जवानांनी अथक परिश्रम घेऊन सुमारे अडीच तासाच्या कालावधीत आग आटोक्यात आणली यावेळी परिसरात धुराचे लोट पसरले होते. या घटनेत जीवित हानी झाली नाही. मात्र पाईप चे कंपनीचे मोठे नुकसान झाले. या घटनेची माहिती पोलिस प्रशासनास



मिळताच पोलिस आणि परिसरातील नागरिक, ग्रामस्थ यांनी मदतीस धाव घेतले. दुपारी साडे तीनचे सुमारास मोठी आग लागली. ही आग लागल्याचे समजताच अग्निशमन विभागास कळविण्यात आले. या वेळी पिंपरी चिंचवड अग्निशमन विभाग, पीएमआरडी विभाग चाकण नगरपरिषद अग्निशमन विभागाचे जवान, कर्मचारी यांनी अथक परिश्रम घेऊन सुमारे साडे पाच चे सुमारास आग आटोक्यात आणली. आळंदी नगरपरिषद अग्निशमन विभागास माहिती मिळताच त्यांनी इतर अग्निशमन विभागास्तात कळवून मदत उपलब्ध करून दिली. आळंदी नगरपरिषद अग्निशमन विभागाची गाडी देखभाल दुरुस्तीस दिल्याचे समजते. यामुळे तत्काळ गाडी दुरुस्त होऊन कार्यरत ठेवण्याची मागणी नागरिकांनी केली. गेल्या पंधरा दिवसां आळंदी परिसरात तीन आगीचे दुर्घटना घडल्या असल्याने उपाययोजना सक्षम आणि कार्यरत अद्यावत ठेवण्याची मागणी आळंदीतून जोर धरत आहे. पुढील तपास पोलिस प्रशासन करत आहे.

## 'जय गणेश भेळ हाउस' येथे ५ फूट उंच कृत्रिम गोमातेचे भव्य उद्घाटन!







पुणे : (स. गांवकरी)

शहरातील 'जय गणेश भेळ हाऊस' येथे प्रवेशद्वारावर उभारण्यात आलेल्या ५ फूट उंचीच्या आकर्षक कृत्रिम गोमातेचे भव्य उद्घाटन उत्साहात पार पडले. या गौचे उद्घाटन शेठ नानजीभाई खिमजीभाई ठक्कर (ठाणावाला) यांच्या हस्ते करण्यात आले.

या उपक्रमामागे उद्योजक कृष्णभाई बिरादार यांची संकल्पना असून, त्यांनी 'जय गणेश भेळ हाऊस'च्या प्रवेशद्वारावर दोन कृत्रिम गौ बसवून एक वेगळाच आकर्षण निर्माण केले आहे. ही सुंदर रचना पाहण्यासाठी नागरिकांची विशेष गर्दी होत असून, सर्वसामान्यांमध्ये ती प्रचंड लोकप्रिय ठरत आहे.

यावेळी कृष्णभाई बिरादार यांनी शेठ नानजीभाई ठक्कर यांचा स्मृतीचिन्ह देऊन सत्कार केला. सत्काराला उत्तर देताना बिरादार म्हणाले की, "नानजीभाई ठक्कर हे आमचे प्रेरणास्थान असून त्यांच्या मार्गदर्शनामुळेच आम्हाला प्रगती साधता आली आहे." कार्यक्रमाला मायमाऊली संस्थेचे अध्यक्ष श्री. पांडुरंग, स्थानिक नगरसेवक, कु. अनुष्का पांडुरंग, सरोजा बिरादार, कु. जान्हवी बिरादार, कु. जयश्री बिरादार, बाबा धुमाळ, कलावंती बिरादार, उमाशेन बिरादार, तेजल, विठ्ठल आदी मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते. याच वेळी कु. जान्हवी बिरादार आणि कु. जयश्री बिरादार यांचा वाढदिवसही आनंदात साजरा करण्यात आला. कार्यक्रमानिमित्त सर्व पाहुण्यांना प्रसाद म्हणून भेल व पाणीपुरीचे वाटप करण्यात आले.

आपल्या मनोगतात नानजीभाई ठक्कर म्हणाले, "मुलींचा सन्मान करणे ही आपली सामाजिक जबाबदारी आहे आणि अशा उपक्रमांमुळे समाजात सकारात्मक संदेश जातो." विशेष म्हणजे, सामान्य व्यावसायिक असलेल्या कृष्णभाई बिरादार यांनी कर्नाटक राज्यात सुमारे १ कोटी रुपये खर्च करून एक भव्य सभागृह उभारले असून, त्यांच्या सामाजिक बांधिलकीचे हे उत्तम उदाहरण मानले जात आहे.

## एसटीच्या NCMC कार्डची जादा दराने विक्री केल्यास परवाना रद्द होणार

ठाणे : (स. गांवकरी)

महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या (एसटी) वतीने सवलतधारक प्रवाशांना NCMC (National Common Mobility Card) स्मार्ट कार्डचे वितरण सुरू करण्यात आले आहे. यासाठी राज्यभरात ३००० हून अधिक अधिकृत विक्रेत्यांची नियुक्ती करण्यात आली असून, प्रत्येक आगार व प्रमुख बसस्थानकांवरही ही कार्डे उपलब्ध करून देण्यात येत आहेत. नवीन NCMC कार्ड घेणाऱ्या प्रवाशांसाठी १९९ रुपये, तर यापूर्वी स्मार्ट कार्ड असलेल्या प्रवाशांसाठी १४९ रुपये असा दर निश्चित करण्यात आला आहे. मात्र, काही अधिकृत विक्रेत्यांकडून सवलतधारक प्रवाशांना जादा दराने कार्ड विक्री केल्याच्या तक्रारी प्राप्त झाल्या आहेत. या पार्श्वभूमीवर, अवाजवी दर आकारणाऱ्या परवानाधारक विक्रेत्यांचे परवाने तात्काळ प्रभावाने रद्द करण्यात येतील, असा स्पष्ट इशारा परिवहन मंत्री तथा एसटी महामंडळाचे अध्यक्ष प्रताप सरनाईक यांनी दिला आहे. यानुसार, काही विक्रेत्यांचे परवाने रद्द करण्यात आल्याची माहितीही त्यांनी दिली. दरम्यान, एसटी महामंडळाने प्रवाशांना दिल्या जाणाऱ्या सवलती अधिक सुसंगत, पारदर्शक आणि डिजिटल पद्धतीने देण्यासाठी NCMC कार्ड कार्यप्रणाली लागू करण्याचा निर्णय घेतला आहे. सध्या महिला, ज्येष्ठ नागरिक आणि 'अमृत' ज्येष्ठ नागरिक यांची नोंदणी व कार्ड वितरण प्रक्रिया सुरू असून, टप्प्याटप्प्याने इतर सवलतधारक प्रवाशांचाही या योजनेत समावेश करण्यात येणार आहे.




# १ लाख ६६ हजाराचा मुद्देमाल जप्त; मुदखेड पोलिसांची कारवाई

## २२० किलो गोवंशाचे मास व काही जिवंत जनावरे जप्त चार आरोपी विरुद्ध गुन्हा दाखल

मुदखेड : (स. गांवकरी)

पोलीस प्रशासनाच्या पथकाने अवैध गोवंश कत्तल प्रकरणावर मोठी कारवाई करत तब्बल १ लाख ६६ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला असून या कारवाईत मोठ्या प्रमाणात गोवंशाचे मांस व जिवंत जनावरे हस्तगत करण्यात आली आहे, तसेच चार आरोपींविरुद्ध गुन्हा नोंद करण्यात मुदखेड ठाण्याचे पोलीस निरीक्षक धीरज चव्हाण यांनी दिली आहे. सकाळी सुमारे ८ वाजता गुप्त माहितीच्या आधारे मुदखेड शहरातील गुजरी चौक परिसरातील कुरेशी गल्ली येथे मुदखेड पोलिसांनी छापा टाकला असता, या ठिकाणी काही इसम



अवैधरित्या गोवंशाची कत्तल करून मांस विक्रीसाठी साठवून ठेवत असल्याची माहिती मिळाल्यानंतर पोलिसांनी तातडीने कारवाई केली. या छाप्यात पोलिसांनी अंदाजे २२० किलो गोवंशाचे मांस तसेच ०९ जिवंत जनावरे जप्त केली. ही कारवाई पोलीस अधीक्षक अविनाश कुमार, अप्पर पोलीस अधीक्षक अर्चना पाटील , सुरज गुरव अपर पोलीस अधीक्षक नांदेड, यांच्या मार्गदर्शनाखाली पोनि धीरज चव्हाण, सपोनि बाबासाहेब कांबळे, उपोनि शिवाजी शिंदे यांच्या नेतृत्वाखाली पोलिस आंमलदार तायवाडे, चक्रधर पाटील, पोहेका झुंजारे, आडे भिशे, सुरनर, रंजीत वानोळे, शिंदे इतर पोलिस कर्मचारी यांच्या संयुक्त पथकाने ही यशस्वी मोहीम राबवली. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, आरोपींनी आपल्या घरात व परिसरात गोवंशाची कत्तल करून मांस साठवून ठेवले होते. काही जनावरे जिवंत अवस्थेत बांधून ठेवलेली आढळली. याप्रकरणी पुढील तपास सुरू असून अशा प्रकारच्या अवैध कृत्यांवर कठोर कारवाई करण्यात येणार असल्याचा इशारा पोलिसांनी दिला आहे. वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांनी तसेच स्थानिक नागरिकांनी या कारवाईचे स्वागत करत अशा बेकायदेशीर प्रकारांवर कायमस्वरूपी आळा बसावा अशी अपेक्षा व्यक्त केली आहे. जप्त करण्यात आलेल्या मुद्देमालाची एकूण किंमत सुमारे एक लाख ६६ हजार रुपये इतकी आहे.


तर यात वेगवेगळ्या प्रकारच्या गायी व कालवडी तसेच विक्रीसाठी तयार ठेवलेले मांस यांचा समावेश आहे. या प्रकरणी मोहम्मद नसीर मोहम्मद नजीर, जुनैद कुरेशी, इरफान कुरेशी आणि मोहम्मद गौस कुरेशी एकूण चार गु र न 84/ 2026 कलम 5, 5 (ब) 5 ( C ) महाराष्ट्र पशु संरक्षण 1976 या कलमाने गुन्हा दाखल. आरोपींविरुद्ध महाराष्ट्र पशु संरक्षण अधिनियम १९७६ तसेच संबंधित कलमान्वये गुन्हा नोंदविण्यात आला आहे.

# स्वगणनेत नागरिकांनी सक्रिय सहभाग नोंदवावा

## सभापती प्रा. राम शिंदे : सभापतींकडून स्वगणना करून जनतेस आवाहन

जामखेड तालुका: (स. गांवकरी)

देशाच्या १६व्या राष्ट्रीय जनगणनेला डिजिटल स्वरूपात प्रारंभ झाला असून, नागरिकांच्या सक्रिय सहभागातून ही प्रक्रिया अधिक सक्षम होणार आहे. प्रत्येक नागरिकाने स्वगणना प्रक्रियेत सहभागी होऊन देशाच्या विकासात आपले योगदान द्यावे, असे आवाहन विधान परिषदेचे सभापती प्रा. राम शिंदे यांनी केले. सभापती प्रा. राम शिंदे यांनी चौंडी येथे स्वगणना करून जनगणना प्रक्रियेचे महत्त्व



अधोरेखित केले. त्यांनी टॅबच्या माध्यमातून स्वतःच्या घरगणनेशी संबंधित सर्व माहिती भरल्यानंतर त्यांचा 'सेल्फ एन्युमरेशन आयडी' तयार झाला. या प्रक्रियेचा प्रत्यक्ष अनुभव घेत त्यांनी नागरिकांना स्वगणना करण्याचे आवाहन केले व ही पद्धत सोपी, सुरक्षित व वेळ वाचवणारी आहे. दि. १ ते १५ मे या कालावधीत नागरिकांना स्वगणनेची सुविधा उपलब्ध असून, त्यानंतर दि. १६ मे ते १४ जून दरम्यान प्रगणकांकडून घरोघरी जाऊन जनगणना करण्यात येणार आहे. जनगणनेच्या या उपक्रमामुळे अचूक व अद्ययावत माहिती संकलित होऊन शासनाच्या विविध योजना अधिक प्रभावीपणे राबविण्यास मदत होणार आहे. डिजिटल जनगणनेमुळे प्रक्रिया सुलभ, जलद व पारदर्शक होणार असल्याचेही त्यांनी नमूद केले.

"जाणकार नागरिक - सक्षम राष्ट्र" ही भावना जपत प्रत्येकाने या ऐतिहासिक उपक्रमाचा भाग व्हावे. देशाच्या सर्वांगीण विकासासाठी स्वगणना ही महत्त्वाची पायरी असून, सर्वांनी जबाबदारीने सहभाग नोंदवावा, असे आवाहन प्रा. राम शिंदे यांनी केले.



सेनगाव : सेनगाव तालुक्यातील शिंदेफळ येथे दोन घरांना भीषण आग लागून संसारोपयोगी साहित्य, शेतीमाल तसेच हळद विक्रीतून आणलेली रोख रक्कम जळून खाक झाल्याची दुर्दैवी घटना घडली. या आगीत शेतकरी कुटुंबांचे मोठे आर्थिक नुकसान झाले असून परिसरात हळहळ व्यक्त होत आहे. मिळालेल्या माहितीनुसार, शिंदेफळ येथील विनोद लोणकर व काशिनाथ तुरुकमने यांच्या घरांना अचानक आग लागली. आग लागल्याचे लक्षात येताच ग्रामस्थांनी तातडीने घटनास्थळी धाव घेत मदतकार्य सुरू केले. मात्र आगीने काही क्षणांतच रौद्ररूप धारण केल्याने दोन्ही घरे पूर्णतः भस्मसात झाली.


## थोडक्यात बातम्या...



### अंगावर हळद लागण्यापूर्वीच नवरदेवाची आत्महत्या; वाघजाळी गाव हादरले

हिंगोली (स. गांवकरी) : सेनगाव तालुक्यातील वाघजाळी येथे अत्यंत दुर्दैवी घटना घडली असून लग्नाच्या आदल्या दिवशी नवरदेवाने राहत्या घरी गळफास घेऊन आत्महत्या केल्याने परिसरात खळबळ उडाली आहे. मिळालेल्या माहितीनुसार, वाघजाळी येथील आनंद हरिभाऊ गांधिले (वय २२) यांचा विवाह दिनांक ७ मे रोजी होणार होता. मात्र अंगावर हळद लागण्यापूर्वीच त्यांनी आपल्या राहत्या घरी गळफास घेऊन जीवन संपवले. ही घटना उघडकीस येताच गावात शोककळा पसरली. आनंद हे कुटुंबातील एकुलते एक पुत्र असल्याने त्यांच्या निधनाने गांधिले कुटुंबावर दुःखाचा डोंगर कोसळला आहे. घटनेची माहिती मिळताच गोरेगाव पोलिसांनी तातडीने घटनास्थळी धाव घेत पंचनामा करून पुढील तपास सुरू केला आहे. लग्नाच्या आनंदोत्सवाचे वातावरण असताना अचानक घडलेल्या या दुर्दैवी घटनेमुळे संपूर्ण वाघजाळी गाव हळहळ व्यक्त करत आहे. आत्महत्येमागील नेमके कारण अद्याप समोर आले नसून पोलिस तपासानंतरच याबाबत अधिक माहिती स्पष्ट होणार आहे.

### साक्षरता वर्गाच्या निमित्ताने वाडी वस्तीवर पोहचला सौर पथदिव्याचा उजेड



आळंदी (स. गांवकरी) : उर्मी संस्थेच्या माधमातून खेड आणि मावळ तालुक्यातील गाव व वाडी वस्तीवर साक्षरता वर्ग चालविले जातात. हे वर्ग मुख्यता रात्रीच्या वेळी भरतात. अनेक वाडी वस्तीवर विजेचा प्रश्न असल्याने वर्गाला येणाऱ्या लोकांना वर्गाच्या ठिकाणी उजेड नसल्याने अडचण येऊन गैरसोय होत होती. वर्ग सुरळीत चालण्यासाठी त्या ठिकाणी ऊर्मी संस्थेच्या वतीने तसेच स्थानिक ग्रामस्थांच्या सहभागाने सौर पथदिवे बसवण्यात आले. खेड मधील कोये आणि कुरकुंडी गावातील ठाकर वस्तीवर संस्थे कडून सौर दिवे उपलब्ध करून देऊन बसविण्यात आले. ग्रामस्थांनी हे दिवे खांब उभारून त्यावर दिवे बसवण्याचे काम केले. रात्रीच्या वेळी उजेडासाठी या दिव्याचा उपयोग ग्रामस्थांना होत आहे. या उजेडात आता रात्रीचे वर्ग भरत आहेत. या साठी कुरकुंडी येथील मायाताई जावळे, कोये येथील हौसाताई डांगले यांनी विशेष पुढाकार घेतला. या उपक्रमाचे परिसरातून कौतुक होत आहे. या मुळे साक्षरता वर्गात उपस्थिती वाढून गैरसोय दूर झाली आहे.



### पालघर जिल्हा संपर्क प्रमुख राहुल लोंढे यांचा अकोलेत सत्कार

अकोले (स. गांवकरी) : अहिल्यानगर जिल्ह्यातील अकोले येथे बाळासाहेबांची शिवसेना पक्षाचे प्रवक्ते तथा पालघर जिल्ह्याचे संपर्क प्रमुख राहुल लोंढे यांचा तालुक्याच्या पदाधिकाऱ्यांच्या वतीने सत्कार करण्यात आला.तसेच युवा सेनेच्या पदाधिकारी यांची आढावा बैठक घेण्यात आली. या प्रसंगी शिवसेना पक्षाचे जिल्हा समन्वयक बाळासाहेब भोर तालुका अध्यक्ष सुशांत गजे कार्याध्यक्ष जगन देशमुख आदी उपस्थित होते. सदर बैठकीत राहुल लोंढे यांनी तालुक्यातील आढावा घेऊन पदाधिकाऱ्यांशी संवाद साधला.युवासेनेचे काम जिल्ह्यात व तालुक्यात वाढवण्याची गरज आहे.अशा सूचना देण्यात आल्या.येणाऱ्या लोकसभा निवडणुकीत शिर्डी लोकसभा मतदारसंघात बाळासाहेबांच्या विचारांचा खासदार व्हावा.अशी अपेक्षा लोंढे यांनी व्यक्त केली.यावेळी जिल्हा समन्वयक बाळासाहेब भोर यांनी जिल्ह्यातील पक्षाची माहिती दिली.पक्ष विभागणी झाल्यावर अकोले तालुक्यात राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे साहेब यांच्या नेतृत्वाखाली अनेक नागरिकांनी बाळासाहेबांच्या विचारांची शिवसेना पक्षात प्रवेश केला.व एक दिवस अकोले तालुक्याचा आमदार हा बाळासाहेबांच्या विचारांचा होईल असा विश्वास जगनशेठ देशमुख यांनी व्यक्त केला.बैठकीत शिवसेनेचे जावेद जहागिरदार यांचा वाढदिवस साजरा करण्यात आला. यावेळी योगेश रूपवते,शंकर संगारे,जगनशेठ देशमुख बाळासाहेब भोर सुशांत गजे,मुकुंदा भोर,महेश देशमुख,जावेदशेठ जहागिरदार,सागर जगताप ,राजेंद्र नाईकवाडी,प्रकाशजी पाचपुते,सचिन शेटे,विशाल शेणकर,यशराज देशमुख,सोमनाथ नवले,मंगेश बाळसराफ ,सचिन भालेराव कपिले आदी कार्यकर्ते उपस्थित होते.

# किनवट शहरातील विजपुरवठा वारंवार खंडित

किनवट: (स. गांवकरी)



किनवट शहरात गेल्या महिनाभरापासून वारंवार खंडित होणाऱ्या विजपुरवठ्यामुळे नागरिकांचे दैनंदिन जीवन विस्कळीत झाले असून, महावितरण विभागाविरोधात तीव्र नाराजी व्यक्त केली जात आहे. याबाबत नगर परिषद किनवटचे गटनेते तथा माजी उपनगराध्यक्ष श्रीनिवास किशनराव नेम्मानिवार यांनी उपकार्यकारी अभियंता, महावितरण विभाग किनवट यांना निवेदन देत तात्काळ उपाययोजना करण्याची मागणी केली आहे. निवेदनात नमूद केल्याप्रमाणे, सततच्या वीज खंडितामुळे शहरातील लघु व्यवसायिकांना मोठा आर्थिक फटका बसत आहे. विशेषतः दुपारच्या वेळेस वीज नसल्याने यंत्रसामग्री बंद पडत असून, हातावर पोट असलेल्या व्यावसायिकांचे काम ठप्प होत आहे. दुसरीकडे घरगुती ग्राहकांना पाणीटंचाईचा सामना करावा लागत असून, वाढत्या उष्णतेत नागरिकांचे हाल होत आहेत. महावितरणची उपकरणे जीर्ण अवस्थेत असून योग्य देखभाल न झाल्याने डी.पी. जळण्याच्या घटना वारंवार घडत आहेत. तसेच विद्युत तारांमध्ये स्पार्किंग होणे, विजेचा दाब कमी-जास्त होणे यामुळे घरातील इलेक्ट्रॉनिक उपकरणांचे नुकसान होत असल्याची तक्रार नागरिकांनी केली आहे. मागील दोन दिवसांत एस.व्ही. कॉलनी परिसर, भाजी मार्केट आणि मोमीनपुरा भागात डी.पी. (रोहित्र) जळाल्याच्या घटना घडल्याने स्थानिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. दरम्यान, या गंभीर समस्येबाबत उपकार्यकारी अभियंता केंद्रे यांच्याशी सविस्तर चर्चा करण्यात आली. यावेळी भाजपा गटनेते श्रीनिवास नेम्मानिवार यांच्या सोबत प्रा. विश्वास कोल्हारीकर, तालुका उपाध्यक्ष जयराज वर्मा, रोहित इटकेपेल्लिवार तसेच परिसरातील अनेक नागरिक उपस्थित होते. बैठकीत वीज वितरणातील तांत्रिक अडचणी, जीर्ण उपकरणे, अपुरी देखभाल आणि वारंवार होणारे खंडित पुरवठा यावर सखोल चर्चा करून तातडीने उपाययोजना करण्याची मागणी करण्यात आली.

या सर्व पार्श्वभूमीवर महावितरण विभागाने तात्काळ दखल घेऊन आवश्यक दुरुस्ती व देखभाल कामे हाती घ्यावीत, तसेच शहरात अखंडित व सुरक्षित वीजपुरवठा सुनिश्चित करावा, अशी मागणी नेम्मानिवार यांनी केली आहे. अन्यथा लोकशाही मार्गाने तीव्र जनआंदोलन उभारण्याचा इशाराही त्यांनी दिला आहे. दरम्यान, शहरातील नागरिकांनीही प्रशासनाने लवकरात लवकर उपाययोजना कराव्यात, अन्यथा उन्हाळ्याच्या पार्श्वभूमीवर परिस्थिती अधिक गंभीर होण्याची शक्यता व्यक्त केली आहे.

# दस्त नोंदणीतून २२१ कोटी ४३ लाख जमा

नांदेड जिल्हा: (स. गांवकरी)

प्रशासकीय पारदर्शकता आणि तंत्रज्ञानाचा प्रभावी वापर यामुळे नांदेड जिल्हातील नोंदणी व मुद्रांक विभागाने सन 2025-26 या आर्थिक वर्षात लक्षणीय टप्पा गाठला आहे. जिल्ह्यातील 18 सह दुय्यम निबंधक कार्यालयांच्या माध्यमातून तब्बल 65 हजार 674 दस्तांची नोंदणी झाली आहे. याद्वारे शासनाला 221 कोटी 43 लाख रुपयांचा महसूल मिळाला आहे. विशेष म्हणजे याच काळात 344 विशेष विवाहाची नोंद देखील यशस्वीरित्या झाली आहे. सह जिल्हा निबंधक वर्ग-1 तथा मुद्रांक जिल्हाधिकारी महेश वडदकर यांनी विभागाच्या कामकाजाबाबत माहिती देताना सांगितले की, कार्यालयात येणाऱ्या नागरिकांची गैरसोय टाळण्यासाठी आणि त्यांना माहिती देण्यासाठी कार्यालयात एक विशेष कक्ष तयार केला आहे. त्यामाध्यमातुन नागरिकांना महाराष्ट्र शासनाने घेतलेले महत्त्वाचे निर्णय आणि योजनांची माहिती दिली जात आहे. तसेच त्यासंबंधी सर्व सह दुय्यम कार्यालयातील दर्शनी भागात फलक लावण्यात आले आहेत. जनतेच्या सोयी साठी शासनाने विविध योजना जाहीर केल्या आहेत. यामध्ये प्रामुख्याने सुटीच्या दिवशीही दस्त नोंदणीचे काम सुरु असून, दस्त नोंदणीसाठी नागरिकांना वेळ मिळावा यासाठी दर शनिवारी आणि रविवारी देखील जिल्ह्यातील एक सह दुय्यम निबंधक कार्यालय सुरू ठेवण्यात आले आहे. 'एक जिल्हा एक नोंदणी' (One District One Registration) या संकल्पनेमुळे आता पक्षकार आपल्या सोयीनुसार जिल्ह्यातील कोणत्याही कार्यालयात दस्त नोंदणी करू शकतात.




# अभिनव शिक्षण संस्थेत महाराष्ट्र दिन व कामगार दिन उत्साहात संपन्न

अकोले: (स. गांवकरी)

अभिनव शिक्षण संस्थेत ६७ वा महाराष्ट्र दिन व आंतरराष्ट्रीय कामगार दिनाचा सोहळा मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. वंदे मातरम्' या राष्ट्रीय गीताने सोहळ्याची सुरुवात झाली. कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे तथा संस्थेचे अध्यक्ष मधुकरराव नवले यांच्या हस्ते ध्वजारोहण संपन्न झाले. त्यानंतर राष्ट्रगीत, राज्यगीत आणि ध्वजगीत गाण्यात आले.संयुक्त महाराष्ट्राच्या लढ्यातील हुतात्म्यांना सामूहिक आदरांजली वाहण्यात आली. यावेळी संस्थेचे अध्यक्ष मा .मधुकरराव नवले यांनी संयुक्त महाराष्ट्र चळवळ, महाराष्ट्र राज्याची स्थापना याबाबत मार्गदर्शन केले. आपल्या मनोगतातून त्यांनी महाराष्ट्रातील संतांचे विचार, छत्रपती शिवरायांच्या कार्याचे महत्त्व विषद केले.संतांचे तसेच महाराष्ट्रातील महान विभूतींचे विचार आचरणात आणून जात, धर्म पंथ भेदभावाच्या बेड्या तोडून रयतेने एकोप्याने व गुण्यागोविंदाने रहावे असे आवाहन केले. या सोहळ्यात वसुंधरा अकॅडेमीच्या विद्यार्थ्यांच्या गीतमंच व वाद्यवृंदाने संगीत शिक्षक इंद्रभान कोल्हाळ यांच्या मार्गदर्शनाखाली संयुक्त महाराष्ट्र चळवळीतील शाहीरी गीते,समतेची गाणी, स्फूर्ती गीते सादर करून उपस्थितांची मने जिंकली. तसेच वसुंधरा अकॅडेमीच्या व मारुतीराव कोते अभिनव पब्लिक स्कूलच्या शिक्षिकांनी सुंदर समूहनृत्य सादर केले. संस्थेच्या व्यवस्थापन समिती व शिक्षक-शिक्षकेतर कर्मचाऱ्यांची वार्षिक सभा संपन्न झाली. यावेळी बुवासाहेब नवले पतसंस्थेचे उपाध्यक्ष रमेश अण्णा जगताप यांच्या वाढदिवसानिमित्त त्यांना शुभेच्छा देण्यात आल्या.

# भाजपाच्या विजयाचा जल्लोष; फटाक्यांची आतषबाजी



किनवट: (स. गांवकरी)

नुकत्याच पार पडलेल्या पाचपैकी तीन राज्यांच्या विधानसभा निवडणुकांमध्ये भारतीय जनता पार्टीने प्रचंड बहुमत मिळवत दणदणीत विजय संपादन केला. या विजयाचा आनंद व्यक्त करण्यासाठी किनवट शहरात भाजपाच्या वतीने उत्साहात जल्लोष साजरा करण्यात आला. किनवट-माहूर विधानसभा मतदारसंघाचे आमदार भीमराव केराम यांच्या मार्गदर्शनाखाली आणि युवा नेते संदेश केराम यांच्या प्रमुख उपस्थितीत, किनवट मंडळ अध्यक्ष स्वागत आयनेनीवार यांच्या नेतृत्वाखाली शहरातील जिजामाता चौक येथे लाडू वाटप करण्यात आले तसेच फटाक्यांची आतषबाजी करून आनंदोत्सव साजरा करण्यात आला. देशभराचे लक्ष वेधून घेतलेल्या पश्चिम बंगाल सह इतर राज्यांतील या विजयामुळे कार्यकर्त्यांमध्ये विशेष उत्साहाचे वातावरण पाहायला मिळाले. "हा विजय जनतेच्या विश्वासाचा असून विकासाच्या राजकारणाला मिळालेला पाठिंबा आहे," असे मत उपस्थित मान्यवरांनी व्यक्त केले. यावेळी किनवट शहर मंडळ अध्यक्ष स्वागत आयनेनीवार, युवा नेते संदेश केराम, माजी उपनगराध्यक्ष श्रीनिवास नेम्मानीवार, किनवट विधानसभा प्रमुख बाबूराव केंद्रे, तसेच राघू मामा यांनी मनोगत व्यक्त करत पक्षाच्या कार्यकर्त्यांचे अभिनंदन केले.

या प्रसंगी माजी जिल्हाध्यक्ष अल्पसंख्यांक मोर्चा मुसा खान, माजी नगराध्यक्ष आनंद मच्छेवार, जिल्हा उपाध्यक्ष संदीप केंद्रे, उत्तर मंडळ अध्यक्ष उमाकांत कराळे, नगरसेवक संतोष मरस्कोल्हे, ॲड माजं बडगुजर, शैलेश गटलेवार, सरचिटणीस बाळकृष्ण कदम, संचालक बालाजी बामणे, बंटी फड, सुनील मच्छेवार, पुनमताई दीक्षित, जयराज वर्मा, सतीश बिराजदार, जगदीश तिरमनवार, माजी नगरसेवक शिवा क्यातमवार, सरपंच अनिल कनाके, सरपंच नागनाथ गेडाम, कृष्णा कलकुंटलावार, राहुल दरगुलवार, सागर पिसारीवार, गौरव इटकेपेल्लीवार, नरसिंग तक्कलवार, आदिवासी मोर्चाचे संतोष कनाके, प्रमोद केंद्रे, अजय येंड्रलवार, अंकित येंड्रलवार, , मनोहर श्रीरामे, गणेश कोल्हे, सुरेश सातपेलीवार, विमर्श पाटील आदी पदाधिकारी, कार्यकर्ते आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. एकूणच, भाजपाच्या या विजयामुळे किनवट शहरात उत्साहाचे आणि आनंदाचे वातावरण निर्माण झाले असून कार्यकर्त्यांनी एकमेकांना शुभेच्छा देत जल्लोष साजरा केला.

# मुख्यमंत्री यांनी 'मिसिंग लिंक' प्रकल्पासाठी नवयुगाचे केले कौतुक

मुंबई: (स. गांवकरी)

Navayuga Engineering Company Limited (NECL) ने मुंबई-पुणे एक्सप्रेसवे 'मिसिंग लिंक' प्रकल्पाचा भाग म्हणून जगातील सर्वात रुंद भूमिगत बोगदा तयार करून कारकिर्दीतला दुसरा गिनीज वर्ल्ड रेकॉर्ड पटकावला आहे. हा अभूतपूर्व पराक्रम भारताच्या पायाभूत सुविधांच्या विकासातील एक महत्त्वाचा टप्पा ठरला असून अभियांत्रिकी कौशल्य आणि आपल्या क्षमता ओलांडण्याच्या धाडसी दृष्टिकोनाचे प्रतीक आहे.



अनेक वर्षांपासून सह्याद्री पर्वतरांगांमधून होणारा मुंबई-पुणे प्रवास निसर्गरम्य असला तरी वेळखाऊ आणि अनिश्चित होता. महाराष्ट्राचे माननीय मुख्यमंत्री श्री देवेंद्र फडणवीस यांच्या दूरदृष्टीतून महाराष्ट्र शासनाने १३.३ किमी 'मिसिंग लिंक' जोडण्याची संकल्पना मांडली. हा प्रकल्प महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ (MSRDCL) यांनी साकारला आणि नवयुगा इंजिनिअरिंग कंपनी लिमिटेडने प्रत्यक्षात आणला. महाराष्ट्र दिनी उद्घाटन झालेला हा 'मिसिंग लिंक' प्रकल्प अभियांत्रिकी उत्कृष्टतेचे प्रतीक ठरला आहे. खंडाळा घाटातील वाहतूक टाळून हा मार्ग प्रवासाचा वेळ सुमारे ३० मिनिटांनी कमी करतो आणि महाराष्ट्रातील महत्त्वाच्या वाहतूक मार्गावरील गर्दी लक्षणीयरीत्या कमी करतो. या ऐतिहासिक क्षणी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री सौ. सुनेत्रा पवार आणि नवयुगा इंजिनिअरिंगचे व्यवस्थापकीय संचालक श्री चिंत श्रीधर उपस्थित होते. नावयुगा इंजिनिअरिंग कंपनी लिमिटेडचे व्यवस्थापकीय संचालक श्री चिंत श्रीधर म्हणाले, "हा केवळ जागतिक विक्रम नाही, तर भारत काय साध्य करू शकतो याचे द्योतक आहे. सह्याद्रीतील कठीण बेसॉल्ट खडकांमध्ये सर्वात रुंद भूमिगत बोगदा उभारणे ही आमच्या जागतिक दर्जाच्या पायाभूत प्रकल्पांची अंमलबजावणी करण्याच्या क्षमतेची साक्ष आहे. गिनीज वर्ल्ड रेकॉर्डकडून मिळालेली ही पावती आणि मान्यता आमच्यासाठी अभिमानाचा क्षण आहे." NECL चे वरिष्ठ उपाध्यक्ष आणि प्रादेशिक प्रमुख श्री रमेश सिंगूरू म्हणाले, "या प्रकल्पासाठी लाखो मनुष्यांची मेहनत, वेळ आणि चिकाटी लागली. या भव्य उपक्रमासाठी गिनीज वर्ल्ड रेकॉर्ड मिळवताना नवयुगाचे प्रतिनिधित्व करताना मला अत्यंत आनंद आणि अभिमान वाटतो."

ते पुढे म्हणाले, "जमिनीच्या मर्यादा आणि डोंगराळ-खोलीच्या भूप्रदेशातील तीव्र उतारांमुळे प्रकल्पात मोठी आव्हाने होती. यावर सूक्ष्म नियोजन आणि प्रगत अभियांत्रिकी उपायांनी मात करण्यात आली. यात ३०० मीटर अंतरावर क्रॉस पॅसेजेस, NATM पद्धतीने नियंत्रित स्फोट तंत्रज्ञानाचा वापर करण्यात आला."

मोठ्या जलसाठ्याखाली बांधकाम करताना अत्याधुनिक SCADA प्रणाली, उच्च-दाब पाण्याच्या फवाऱ्याद्वारे अग्निशमन, ITMS, सार्वजनिक घोषणा प्रणाली, SOS यंत्रणा आणि प्रगत वायुवीजन प्रणाली यांचा वापर करून उच्च सुरक्षामानके राखली गेली. तसेच सुमारे १८० मीटर खोल दरीत UHPFRC गर्डर्स वापरून व्हायाडक्ट बांधण्यात आले.

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक डॉ. विश्वासराव आनंदराव आरोटे यांनी सोनेरी छत्रपती प्रिंटर्स, भिंगारे गोडावूनजवळ, अकोले, ता. अकोले, जि. अहमदनगर – ४२२६०१ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक समर्थ गांवकरी कार्यालय, भिंगारे गोडावूनजवळ, अकोले, ता. अकोले, जि. अहमदनगर – ४२२६०१ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. This newspaper is printed by owner, printer, publisher, editor Vishwasrao Anandrao Arote at Soneri Chhatrapati Printers, Near Bhingare Godown, Akole, Tq. Akole, Dist. Ahmednagar - 422601.
पुणे निवासी संपादक : प्रतिक गंगणे, मुंबई विभागीय संपादक : दशरथ चव्हाण, व्यवस्थापक : संजय फुलसुंदर कार्यकारी संपादक : नवनाथ जाधव, ॲड. रचना भालके (हायकोर्ट), ठाणे
पुणे विभागीय कार्यालय : फ्लॅट नं. ४०६, व्यंकटेश विश्व, अभिरूची परिसर समोर, पारे कंपनी रोड, नऱ्हे, पुणे – ४११०४१ / ठाणे विभागीय कार्यालय : A-1, भाग्यश्री छाया, बेसमेंट, आवाज रेडिओ जवळ, डेअरी कॉटेज, इदुलजी रोड, चाराई, ठाणे (वे.)